# चैतन्य लहरी

मार्च - एप्रिल २००७

अंक क्र. ३/४










## वाढदिवस समारंभ, २० मार्च २००७













## अनुक्रमणिका


- ईस्टर पूजा,प्रतिष्ठान, श्रीमाताजींची अमृतवाणी, ८,एप्रिल२००७ ........ २
- ईस्टर पूजा (वृत्तांत),प्रतिष्ठान, ८ एप्रिल २००७ ........ ३
- शिवपूजा- वाढदिवस समारंभ, निर्मलनगरी पुणे (वृत्तांत) ........ ४
- वाढदिवस समारंभ, प्रतिष्ठान, २० मार्च २००७ ........ ७
- शिव पूजा, श्री पापाजींचे भाषण, १९,एप्रिल,२००७ ........ ८
- सहज संग्रहालय उदघाटन सोहळा,श्री पापाजींचे भाषण, २० मार्च, २००७ ........ ९
- सहज संग्रहालय उद्घाटन समारंभ (वृत्तांत), २० मार्च, २००७ ........ १०
- श्रीमाताजी व श्री पापाजी लग्नाचा ६०वा वाढदिवस समारंभ,(वृत्तांत)प्रतिष्ठान ७, एप्रिल २००७ ........ ११
- श्रीमाताजी व श्री पापाजी लग्नाचा ६०वा वाढदिवस प्रतिष्ठान, (वृत्तांत) ६, एप्रिल २००७ ........ १२
- श्रीमाताजींच्या लग्नाच्या ६०व्या वाढदिवसाच्या दिवशीचे श्रीपापाजींचे भाषण प्रतिष्ठान,७, एप्रिल २००७ ........ १३
- अक्षयतृतीया पूजा,(वृत्तांत) प्रतिष्ठान,पुणे ,१९,एप्रिल २००७ ........ १५
- श्रीमाताजींचे प्रतिष्ठानमधून प्रस्थान(वृत्तांत) २०, एप्रिल २००७ ........ १५
- ईस्टर पूजा, प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण, कलकत्ता,एप्रिल ९५ ........ १६


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट,सी.डी., पुस्तके, मासिके,श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था, ''**निर्मल ट्रान्स्फॉरमेशन प्रा.लि.पुणे**'' या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, **निर्मल ट्रान्स्फॉरमेशन प्रा.लि.पुणे**. या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लिडरवर राहिल.

तसेच चैतन्य लहरी मासिकाचे सन २००७ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL TRANS-FORMATION PVT. LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यांसाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD.
kOTHRUD, PUNE 411 O38. TEL. 020 25286537

# ईस्टर पूजा

## प्रतिष्ठान, दिनांक ८,एप्रिल२००७

प्रदीर्घ कालावधीनंतर श्रीमाताजींची अमृतवाणी ऐकण्याचे भाग्य लाभले. ही घटना खरोखरच अतिशय आनंददायी, प्रेरणादायी, शक्तीदायी होती. -

आजचा दिवस हा फार महत्त्वाचा आहे. आत्तापर्यंत या कार्यासाठी अतिशय खडतर परिश्रम घेतले आहेत. पण तुम्हाला अजून जास्त प्रमाणात कामे करावयाची आहेत अशी तुमची स्वत:ची इच्छा असली पाहिजे.इच्छा प्रबळ असली तर हे कार्य नक्की होईल. तेव्हां तुम्ही असा निश्चय करा की, सर्वांना परमात्म्याचा हा आशीर्वाद मिळाला पाहिजे. बरेच जणांना हे आशीर्वाद (आत्मसाक्षात्कार) मिळाले आहेत. पण इतरांना द्यायला पाहिजे.

मला माहीत आहे की, तुम्हां सर्वांचे जीवन आनंद, उत्साहाने भरून गेले आहे. आजच्या दिवसाचे महात्म्य असे आहे की, येशुख्रिस्त आपल्या सर्वांसाठी परत आले. आजच्या दिवशी तुम्हाला ही अशी शक्ती प्राप्त झाली आहे की तुम्ही दुसऱ्यांनाही आत्मसाक्षात्कार देऊ शकता. त्यांचे पुनरुत्थान घडवून आणू शकता. ज्यांना हे प्राप्त झालेआहे त्यांनी आपली शक्ती इतरत्र वाया दवडू नका. आज जगात काय चालले आहे? जर लोकांना या भयाण परिस्थितीतून बाहेर काढायचे असेल, संकटांपासून वाचवायचे असेल, तर त्यासाठी सह्जयोग हा एकच मार्ग आहे.

सहजयोगी हा आनंदी व दुसऱ्यांना आनंद देणारा असावा. तुम्ही सर्व सहजयोगी आहात हे लक्षात ठेवा. तुम्हाला सर्वांना उत्तम आरोग्य लाभले आहे. काळजी करण्यासारखे काहीच नाही. तुम्ही सहजयोगी हे विशेष निवडलेले लोक आहात. तुम्हा सर्वांना बघून खूप आनंद होत आहे. पण अजून असे बरेच लोक आहेत की त्यांना आत्मसाक्षात्कार मिळायचा आहे. आजचा दिवस हा चांगला आहे. निश्चय करा की आपल्याला सहजयोगाचा प्रचार-प्रसार करायचा आहे. जगात खूप समस्या आहेत त्या समस्या दूर व्हायला हव्यात. हा आत्मसाक्षात्कार फुलू दे.

तुम्हाला काही शंका नसतीलच. जर असतील तर तुम्ही मला लिहू शकता. सहजयोगात खूप लोक येत आहेत. ते चांगले आहेत. त्यांना सहजयोगात आणायला मदत करा. आजचा दिवस हा फार चांगला आहे. येशुख्रिस्त हा सहजयोगीच होता. त्याने प्रयत्न केलाच. पण त्यावेळी लोक जागरुक नव्हते, पण आता तुम्ही फार नशीबवान आहात. तुम्हाला जे मिळाले आहे ते दुसऱ्यांना देण्यासाठी आहे. जर तुम्हाला काही वैयक्तिक समस्या असतील तर तुम्ही मला लिहू शकता. आजच्या या विशेष दिनी यापेक्षा अधिक महत्वाचे काय असणार?

सर्वांना अनंत आशीवाद.

# ईस्टर पूजा (वृत्तांत)

## प्रतिष्ठान, ८ एप्रिल २००७

प्रतिष्ठानमधील कॉन्फरन्स हॉलमध्ये पूजेचे आयोजन केले होते. साधारण रात्री ८.०० च्या सुमारास श्रीमाताजी व श्रीपापाजींचे हॉलमध्ये आगमन झाले. श्रीमाताजींच्या चरणांवर विदेशी सहजयोग्यांनी हार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजीना सुवासिनींनी ओवाळले.

श्रीमाताजींच्या चरण पूजेसाठी श्री पुगालिया यांनी उपस्थित असलेल्या विदेशी सहजयोगी तसेच काही मान्यवरांना श्रीमाताजींच्या चरणांवर फुले वाहण्यासाठी बोलावले. त्यावेळी श्री अरुण आपटे ,श्रीमती धायडे आणि सहकारी यांनी ,'आज आमच्या धामी आल्या, नमो नमो मारिया, मरणच मेले प्रभु माझे विजयी झाले,ऐसा तो हमे ज्ञान', ही भजने सादर केली. चरण पूजेच्या शेवटी उपस्थित असलेल्या लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणांवर फुले वाहिली. श्रीमाताजींना प्रसाद दाखविण्यात आला. त्यांना अत्तर लावण्यात आले.

त्यानंतर श्रीमाताजींची विदेशी सहजयोग्यांनी आरती केली. त्यावेळी श्रीपापाजी बाजूला उभे राहून सर्वसाधारण सहजयोग्यांसारखे टाळ्यावाजवून आरती करीत होते.त्यानंतर जगातील सर्व सहजयोग्यांच्या दृष्टीने अत्यंत आनंदाचा क्षण म्हणजे श्रीमाताजींनी सर्वांना माईकवर इस्टर पूजेनिमित्त मार्गदर्शन केले.(स्वतंत्र दिले आहे.) मागील चार वर्षापासून सर्वजण ज्याची अत्यंत आतुरतेने वाट पहात होते ती श्रीमाताजींची अमृतवाणी सर्वांना ऐकायला मिळाली. ती ऐकल्यावर सर्वजण भारावून गेले. श्रीमाताजींनी दिलेल्या संदेशानंतर श्रीपापाजींनी श्रीमाताजींचे सर्व जगातील सहजयोग्यांच्या वतीने आभार मानले. तसेच श्रीमाताजींनी भाषणात सांगितलेला संदेश, सर्वांनी सहजयोगाचा प्रसार व प्रचार करावा याची आठवण सर्वांना करून दिली.

त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर इस्टर केक मांडण्यात आला. श्रीमाताजी व श्रीपापाजीनी टाळ्यांच्या प्रचंड आवाजात केक कापून इस्टर साजरा केला. इस्टरचा केक अतिशय सुंदर असा होता. त्याच्या मधोमध एका अंड्यावरती उर्दू भाषेत पवित्र संदेश लिहिलेला होता. श्रीमाताजींना श्रीपापाजींनी केक भरविला. त्यानंतर श्रीमाताजींनी श्री पुगालिया यांना श्रीपापाजींना केक भरविण्याबाबत सांगितले. त्यानंतर श्री पापाजींना श्री पुगालिया यांनी केक भरविला.

त्यानंतर प्रथम इंटर नॅशनल गिफ्ट श्रीमाताजींना अर्पण करण्यात आले. त्यावेळी अनेक वर्षानंतर श्रीमाताजी प्रत्येक गिफ्ट पहात असताना त्याबाबत विनोद करुन सर्वाना हसवित असताना स्वत:देखील हासत होत्या.त्यातील एक सुंदर कलात्मक कलशावर वेगवेगळ्या प्राण्यांची चित्रे होती. ती पहात असताना श्री माताजी म्हणाल्या की , यामध्ये, 'लायन दिसत नाही' ,तसेच एक सुंदर गिफ्ट सात घोडे असलेला रथ गिफ्ट श्रीमाताजींच्या समोर आणल्यावर श्रीमाताजी म्हणाल्या कि,'सात घोडे म्हणजे सात सहजयोगी आहेत.'आणि हसायला लागल्या. त्यांनंतर गुजराथ, राजस्थान, कलकत्ता तर्फे गिफ्ट श्रीमाताजींना देताना श्रीमाताजी त्या ठीकाणच्या सहजयोगाच्या कार्याबद्दल विचारीत होत्या. त्यानंतर श्रीमाताजींच्या हस्ते हैद्राबादहून खास आलेल्या कव्वालांना बिदागी देण्यासाठी श्रीमाताजींसमोर बोलावण्यात आले. त्यावेळी श्रीमाताजी म्हणाल्या की, 'यांनी तर कव्वाली गायलीच नाही' त्यावेळी प्रचंड हशा झाला. आणि कव्वालांनी , 'मेरी माता सलामत रहे' ही कव्वाली सादर केली. त्यावेळी उपस्थित असलेल्या सर्वांनी श्रीमाताजींवरून पैसे नाचत नाचत ओवाळून कव्वालांना दिले. त्यानंतर अतिशय आनंदात श्रीमाताजी व श्रीपापाजी आपल्या शयनकक्षात गेले.

इकडे बाहेरच्या बाजूला सर्वजण आनंदाने बऱ्याचवेळ नाचत होते. त्यामध्ये सर्व ट्रस्टी सहभागी झाले होते. कार्यक्रम संपला तेव्हा जवळ जवळ १२.०० वाजले होते.

● ● ●

# शिवपूजा- वाढदिवस समारंभ

## निर्मलनगरी पुणे (वृत्तांत)

पुण्यातील खाटपेवाडीतील आपल्या स्वत:च्या जागेत निर्मलनगरीत शिवपूजा व वाढदिवस पूजेचे आयोजन केले होते. त्यासाठी जगभरातून सहजयोग्यांचे दिनांक १६ पासूनच आगमन सुरू झाले होते.

दिनांक १८.३.२००७

आजच्या दिवसाची सुरवात सकाळी ६.०० च्या सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर ११.०० च्या सुमारास सकाळच्या भजनांच्या कार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर संदीप दलाल यांनी, 'जय गणेश जय गणेश जय गणेश देवा' हे भजन सादर केले. गिरीजा दिवेकर यांनी, 'गुंजे सदा जयकार', श्रीमती काळे यांनी, 'निर्मल नाम तुझे चांगले,' रतना ने, 'आओ जी आओ म्हारा हृदय मे आईच्या नावाचा गजर होऊ दे,' मुग्धा/ नेहा, 'मदर वुई बिलॉग टू यु', गजानन थोरात यांनी, 'ओम कार स्वरूपा, युग आज एक नया,' निशिकांत पाठक यांनी, 'निर्मल नाम तु जपले', प्राची भोंडे ,भरतनाट्यम्, तरेश शर्माने राग भैरागी, शेवटी भरतनाट्यम्मध्ये शिवमानस पूजा सादर केली. सकाळचा कार्यक्रम संपला तेव्हा साधारण १.०० वाजले होते.

संध्याकाळी ६.३० च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर आलेल्या सर्व सहजयोग्यांचे श्री राजेंद्र पुगालिया यांनी स्वागत केले. त्यानंतर त्यांनी आणि क्रिस्ट यांनी श्रीमाताजींच्या प्रतिमेस हार अर्पण केला. त्यानंतर क्रिस्ट यांनी छोटेसे भाषण केले. त्यामध्ये त्यांनी श्रीमाताजीं पूर्वी शिवांबद्दल जे बोलल्या होत्या त्याबद्दल थोडेसे सांगत कार्यक्रमाची सुरवात केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुंबईच्या सहजयोगी बंधु/ भगिनीने केले. त्यांनी प्रत्येकाची माहिती हिंदी व इंग्रजीतून सांगत कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. तसेच दोन कार्यक्रमांच्या मधल्या तयारीच्या वेळेत अतिशय खुबीने शिवांचे मंत्र सादर करीत कार्यक्रमाची रंगत वाढविली.

सुरवातीला एन.जी.ओ.च्या मुलांनी, 'आज भी कैलाश में बज रहे घुंगरू नाच रहे शिवजी,' 'तेरी चैतन्य लहरोंका कोई भेद न पाया है' त्यानंतर 'परमेश्वरी भगवती निर्मल माँ हमे तेरे ममता का आश्रय मिला'. या भजनावर अतिशय सुंदर नृत्य सादर केले. त्यानंतर वैतरणा ॲकॅडमीच्या ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. श्री सुब्रमण्यम यांनी , 'ओम नमो शिवाय हर हर हर भोले जय शंकरा गौरी हरा, हर,हर हर महादेव', ॲकॅडमीच्या विद्यार्थीनी राग कलावतीमध्ये, 'आदिशक्ति माँ तुम भवानी, श्री सुब्रमण्यम यांनी, 'निर्मल माँ निर्मल माँ आखों मे बसी माँ मेरे दिलमे बसी माँ' या भजनाने शेवट केला.

त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या एका १० वर्षाच्या मुलीने अतिशय मोहक असा कुचिपुडी नृत्याचा प्रकार सादर केला. त्यानंतर,'नमस्तस्यै महामाये श्रीपीठे सूर पूजीते' या महालक्ष्मी अष्टकमल भजनावर नृत्य केले. कार्यक्रम संपला तेव्हा सर्वांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात तिचे कौतुक केले. त्यानंतर ज्येष्ठ संगीत गायक सहजयोगी श्री संजय तलवार यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी श्रीमाताजींसमोर २५ वर्षापूर्वी प्रथम गायले ते भजन, 'हे दौलत मिली कुंडलिनी की हमको', 'खुदकी खुदको खोकर', 'सहज की धाराओ का हम अमृत पीते है जय श्रीदेवी जय श्री माता कहके हम जीते है'.त्यानंतर बंगलोरच्या पंडित शक्तीधर यांनी बासरीवर राग 'कौशिक' सादर केला. शेवटी पहाडी धून वाजवून सर्वांची वाहवा मिळविली. संगमनेरचे श्री संग्राम देशमुख यांनी शिवांचे तांडव नृत्य सादर केले.

रात्री १०.०० च्या सुमारास पुणे म्युझिक ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला, 'दिलमे दिदार की आरजू है' ही कव्वाली सादर केली. त्यानंतर 'कुंडलिनी चढी बढी जाये,' शेवटी 'गोंधळ ' सादर करुन सर्वांना नाचवले.

ऑस्ट्रेलियन म्युझिक ग्रुपने 'बोलो शिव शिव शंभो' हे

भजन सादर केले. त्यानंतर सौ वर्मा आणि सहकार्‍यांनी 'जय भोला भंडारी शिव बोला भंडारी', 'शंकर भोले भाले वो तो भक्तों के रखवाले 'ही भजने सादर केली. त्यानंतर डॉ राजेश युनिव्हर्सल यांनी, 'दिन बंधु निर्मल माँ प्यारे कृपा करो कृपा करो हम पे श्री माँ' हे भजन सादर केले.शेवटी नॉयडा ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी 'भोले बाबा चले कैलाश' ,हे भजन तसेच त्यानंतर अनेक भजने सादर करीत सर्वांना नाचवले.

### दिनांक १९ मार्च २००७

आजच्या शिवपूजेच्या दिवसाची सुरवात सकाळच्या ६.०० च्या सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सकाळी १०.३० च्या सुमारास तीन महामंत्रांनी कार्यक्रमाची सुरवात केली. त्यानंतर दुबईच्या म्युझिक ग्रुपने , 'गणेशा गणेशा जय श्री गणेशा', 'हमको मनकी शक्ती देना', 'श्री माताजी कृपा करो', शेवटी 'गोंधळ' सादर केला. त्यानंतर लक्ष्मी पाटील या मुलीने भरतनाट्यम सादर करताना, 'मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश','शंकर स्तुती सादर केली'. त्यानंतर शर्माने कथ्थक सादर केले. निशिकांत पाठक हिने 'गौरी हरा दिनानाथा धरीन तुझे पाय' हे भजन सादर केले त्यानंतर सकाळचा कार्यक्रम संपला.

संध्याकाळी ६.३० च्या सुमारास समोरच्या स्टेजवरील पडदा बाजूला केला गेला आणि समोरच्या भव्य स्टेजचे दर्शन सर्वांना झाले त्यामध्ये मागच्या बाजूला दगडांच्या मध्ये मध्ये अनेक मूर्त्या असलेली लेणी उभारली होती. त्यावर विद्युत रोषणाई केली होती.आज गुढीपाडवा असल्याने स्टेजच्या दोन्ही बाजूला दोन गुढ्या उभारल्या होत्या. गुढीपाडव्याचे महत्त्व सर्वांना सांगण्यात आले त्यामध्ये शालिवाहन काळापासून गुढीपाडव्याला महत्त्व असल्याचे सांगताना श्रीमाताजींचा जन्म शालिवाहन कुळात असल्याची माहिती दिली. त्यानंतर श्रीमाताजींनी २००३ साली मुंबईत गुढीपाडव्याबाबत सागितलेल्या संदेशाची हिंदीत व इंग्रजीत माहिती सर्वांना दिली. त्यानंतर कार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर सर्वांनी पाच मिनिटे ध्यान केले. सुरवातीला, 'उमा उमा शिव शंकर' हे भजन श्री अरुण आपटे यांनी सादर केले. पुणे म्युझिक ग्रुपने 'सदाशिवा सदाशिवा नमोस्तुते' हे भजन सादर केले. श्याम जैन यांनी 'जय गंगे भागिरथी जय गंगे भागीरथी',संजय तलवार यांनी , 'सीटिंग इन द हार्ट ऑफ दी युनिव्हर्स,' डॉ राजेश युनिव्हर्सल यांनी 'जय शिव शंकरा गौरी अंबे,' मुखिराम यांनी ,' भोले बाबा चले कैलाश बुंदीया पडने लगी,' 'डम डम डम डमरु बजाये,' सुब्रमण्यम यांनी,'शंकर तेरी जटा मे बहती है गंगा धारा,' नॉयडा ग्रुपने,'श्री जगदंबे आई रे मेरी निर्मल माँ' ही भजने सादर केली. रात्री ८.०० च्या सुमारास श्रीमाताजींचे निर्मल नगरीत आगमन झाले. त्यावेळी त्यांच्या सोबत श्री पापाजी व सौ कल्पनादीदी होत्या.

सुरवातीला श्रीमाताजींची आरती करण्यात आली. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणावर फुले अर्पण करून श्रीमाताजींची पूजा केली. त्यावेळी सुरवातीला,'विनती सुनिये आदिशक्ती मेरी','गणेश अथर्वशीर्ष,' 'तेरे ही गुण गाते है', त्यानंतर सात सुवासिनी स्टेजवर ओटी भरण्यासाठी आल्या. त्यावेळी श्रीमाताजींच्या चरणाची पूजा कल्पनादीदींनी कुंकू लावून केली. त्यानंतर श्रीमाताजींचा देवी रूपातील श्रृंगार कल्पनादीदींनी केला त्यानंतरश्रीमाताजींचे देवी स्वरूपातील रुपाचे दर्शन सर्वांना झाले. त्यानंतर श्रीमाताजींना शिवांच्या स्वरुपाची पूजा सुरू झाली . त्यावेळी श्रीमाताजींचे सिहासन पांढऱ्या कापडाने झाकण्यात आले. श्रीमाताजींच्या अंगावर सर्वत्र पांढरे वस्त्र पांघरण्यात आले. त्यांच्या चरणावर व कपाळावर भस्म लावण्यात आले. गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घालण्यात आल्या.त्यावेळी, 'शिवो ऽ म शिवो ऽ म' , 'आया माता का पूजन दिन आया शिवरात्रीका आनंद छाया, बोलो शिव शंभो बम बम बम,' त्यानंतर श्रीमाताजींचे सर्वांना शिवरुपातील दर्शन झाले. श्रीमाताजींना प्रसाद अर्पण करण्यात आला. इंटरनॅशनल गिफ्ट म्हणून श्रीमाताजींना ११ साड्या प्रेझेंट देण्यात आल्या.नंतर श्री पापाजींनी सर्वांना मार्गदर्शनपर भाषण केले.(अंकात स्वतंत्र दिलेले आहे.) त्यानंतर श्रीमाताजींचे प्रतिष्ठानकडे प्रस्थान झाले. सर्वांना महाप्रसाद देण्यात आला.

### दिनांक २० मार्च २००७

आजच्या दिवसाची सुरवात सकाळी ६.०० सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर संध्याकाळी ६.३० च्या सुमारास पुणे म्युझिक ग्रुपने कार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी केली. नंतर

त्यांनी आज आमच्या दारी आल्या माता निर्मला देवी हे भजन चालू असताना श्रीमाताजींच्या प्रतिमेस पंचारतीने ओवाळण्यात आले.

त्यानंतर टर्की आणि इराणच्या सहजयोगी प्रतिनिधींनी श्रीमाताजींचा संदेश सांगितला. टर्कीच्या सहजयोग्यांनी, 'मेरी माता का करम है' ही कव्वाली सादर केली. त्यांनी सांगितले की, टर्कीमध्ये १९८९ सालापासून सहजयोगास सुरवात झाली त्यावेळी श्रीमाताजींनी फातीमा पूजा घेतली होती. टर्कीमध्ये अनेक मुस्लिम लोकांनी सहजयोग स्विकारला आहे. आज टर्कीमधे दरवर्षी हजारो मुस्लिम सहजयोगात प्रवेश करीत आहेत.

साधारण ७.४० च्या सुमारास श्रीपापाजी व सौ कल्पनादीदींचे निर्मलनगरीत आगमन झाले. त्यांच्या हस्ते सहज संग्रहालयाचे उद्‌घाटन झाले.रात्री ९.०० च्या सुमारास कार्यक्रमासाठी जगप्रसिद्ध मोहनवीणा वादक श्री विश्वमोहन भट व तबला वादक श्री विजय घाटे यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी राग मारु बिहार सादर केला. तसेच अनेक गाण्यातील प्रकार सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली. त्यांचा कार्यक्रम संपल्यानंतर इराकच्या म्युझिक ग्रुपने गाणी सादर केली. दुबईच्या सहजयोग्यांनी डान्स सादर केला. शेवटी धाकडे गुरुजींनी व्हायलीनवर राग सादर केला.

### दिनांक २१मार्च २००७

आज आदिशक्ती श्रीमाताजींच्या ८४ वा वाढदिवस पूजा समारंभाच्या दिवसाची सुरवात सकाळच्या ६.०० च्या सामूहिक ध्यानाने झाली.

संध्याकाळी ६.३० च्या सुमारास स्टेजवरील पडदा बाजूला झाला. स्टेजवर फुग्यांनी सजविलेल्या अतिशय सुंदर आरासीचे सर्वांना दर्शन झाले. सुरवातीला तीन महामंत्र झाले. सौ आपटे यांनी, 'तुम आशा विश्वास हमारा', इराकच्या सहजयोग्यांनी गिटार व संतुर वर राग वाजवला. दिनांक २० मार्च च्या रात्री प्रतिष्ठानमध्ये श्रीमाताजींच्या समोर केक कापण्यात आला ती सी.डी. दाखविण्यात आली. श्रीमाताजींचे जन्मस्थान असलेल्या छिंदवाडा येथिल पवित्र वास्तुची सी.डी. दाखविण्यात आली. मुखिराम यांनी, 'तेरे सहजी पुकार रहे आज आवो मेरी निर्मल माँ,'साधारण ८.४० च्या सुमारास श्रीमाताजींचे निर्मलनगरीत आगमन झाले. त्यांच्या सोबत श्रीपापाजी सौ कल्पनादीदी श्री श्रीवास्तव साहेब, सौ साधनादीदी त्यांची मुलगी व जावई, नातू या सर्वांचे आगमन झाले. त्यावेळी, अथ स्वागतद् या भजनाने स्वागत केले. श्रीमाताजींची आरती केली. श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला.

लहान मुलांनी श्रीमाताजींची चरण पूजा फुले वाहून केली. त्यावेळी प्रथम अथर्वशीर्ष, नंतर 'जागो सवेरा', 'जनम दिन आयो आदिशक्ती का', ही भजने झाली. सात सुवासिनींचे स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी सौ कल्पनादीदी व सौ साधनादीदींनी श्रीमाताजींच्या चरणाची कुंकवाने पूजा केली. श्रीमाताजींना पूजेतील सर्व दागिने घातले. मुकुट घालण्यात आला. सुवासिनींनी ओटी भरल्यानंतर श्रीमाताजींचे वाढदिवस पूजेचे सर्वांना दर्शन झाले. त्यानंतर श्रीमाताजींची जागतिक सहजयोग्यांतर्फे आरती करण्यात आली.

श्रीमाताजींना महाप्रसादाचा नैवेद्य दाखविण्यात आला. नंतर त्यांची दृष्ट काढण्यात आली. श्रीमाताजींच्या शेजारी श्री पापाजींसाठी एक आसन ठेवण्यात आले. श्रीमाताजी व श्रीपापाजींसमोर असे दोन सुंदर केक ठेवण्यात आले. प्रथम श्रीमाताजींच्या समोरील केक श्रीमाताजींनी श्रीपापाजी, सौ कल्पनादीदी, सौ साधनादीदी यांच्या समवेत टाळ्यांच्या प्रचंड आवाजात केक कापला. त्यानंतर श्रीपापाजींच्या समोरील केक श्रीपापाजींनी व श्री माताजींनी कापला.त्यानंतर श्रीपापाजींनी श्रीमाताजींना केक भरवला. श्रीमाताजींनी सौ कल्पनादीदींच्या मदतीने श्रीपापाजींना केक भरवला.

सौ साधनादीदींचा नातू (श्रीमाताजींचा पणतू) ह्याने स्टेजवरील गॅसचे फुगे स्टेजवरून आकाशात सोडून वाढदिवसाचा आनंद वाढवला. त्यानंतर इंटरनॅशनल गिफ्ट श्रीमाताजींना अर्पण करण्यात आले.त्यावेळी श्रीमाताजींच्या वाढदिवसानिमित्त जगभरातून आलेले शुभसंदेश राजेश शहांनी वाचून दाखविले.त्यात भारताचे राष्ट्रपती श्री अब्दुल कलाम यांचा संदेश वाचून दाखवताना त्यांना श्रीमाताजींबद्दल वाटणारा प्रचंड आदर व्यक्त होत होता.

श्रीपापाजी स्वतः, 'जय श्रीमाताजी' असे बोलले. त्यानंतर सर्व सहजयोगी अनेक वेळा 'जय श्रीमाताजी''जय श्रीमाताजी'

असा जयघोष करीत होते. प्रत्येकवेळी श्रीपापाजी उत्स्फूर्तपणे हात वर करीत होते.श्रीपापाजींनी सेमिनारची उत्कृष्ट व्यवस्था ठेवल्याबद्दल श्री राजेंद्र पुगालिया यांचे कौतुक केले. श्रीपापाजींनी, मेरी माता का करम है, ही कव्वाली म्हणायला सांगितली. सदर कव्वाली सादर करताना सर्वजण अतिशय आनंदात नाचत होते. त्यानंतर श्रीमाताजींचे प्रतिष्ठानकडे प्रस्थान झाले. इकडे रात्री बऱ्याचवेळापर्यंत सर्वजण आनंदाने नाचत होते. त्यानंतर सर्वांनी महाप्रसादाचा आनंद घेतला.

भारतात पुण्यामध्ये अनेक वर्षानंतर एकाच वेळी दोन पूजांचे आयोजन करण्यात आले होते. त्याची पूर्वतयारी मागील २/३ महिन्यापासून चालू होती. पुण्यातील अनेक कार्यकर्ते रात्रंदिवस कार्यरत होते. पुण्यातील सहजयोग्यांच्या सोबत भारतातून राजस्थान, गुजराथ, दिल्ली, उत्तरांचल, हारियाणा, हैद्राबाद, मद्रास, कलकत्ता, अशा सर्व भागातील सहजयोगी पूर्वतयारीसाठी सेमिनारच्या ठिकाणी आले होते. सर्वांची राहण्याची, जेवणाची, तसेच पाण्याची अत्यंत चांगली व्यवस्था केली होती.

सर्वजण आपल्या हृदयातील श्रीमाताजींचे साकार रूपातील पाहिलेले रूप डोळ्यात साठवत सहस्रारावर वाहत असलेल्या प्रचंड चैतन्याच्या आनंदात आपल्या घराकडे परतु लागले.

जय श्रीमाताजी.

● ● ●

# वाढदिवस समारंभ, प्रतिष्ठान

## दिनांक २० मार्च २००७

## (वृत्तांत)

२० मार्चच्या रात्री १२.०० च्या सुमारास श्रीमाताजींच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. श्रीमाताजींचे साधारण ११.४५ च्या सुमारास प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये आगमन झाले. त्यावेळी त्यांच्यासोबत श्री पापाजी व सौ कल्पनादीदी होत्या. त्यावेळी श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला.

पुणे म्युझिक ग्रुपचे श्री राहूल कुलकर्णी आणि सहकाऱ्यांनी श्रीमाताजींसमोर भजने सादर केली. त्यावेळी त्यांनी सुरुवात, 'मेरी माता का करम' या कव्वालीने केली. त्यानंतर 'जनम दिन आयो,' 'छिंदवाडा मे जनम हुवा हमारी निर्मल माँ का', 'शुभ मंगलमय दिवस आया' ही भजने सादर केली.

श्रीमाताजींची लहान मुलगी सौ साधनादीदी, त्यांची मुलगी,जावई, व श्रीमाताजींचे पणतू, यांचे प्रतिष्ठानमध्ये आगमन झाले. त्यावेळी श्रीमाताजी व श्री पापाजींचे आलेल्या सर्व नातलगांनी दर्शन घेतले. श्रीमाताजींच्या समोर अतिशय सुंदर असे दोन केक मांडण्यात आले. सौ कल्पनादीदी, सौ साधनादीदी यांच्या सोबत श्रीमाताजींनी श्रीपापाजींच्या मदतीने वाढदिवसाचा केक कापला. त्यानंतर श्री पापाजींनी श्रीमाताजींच्या मदतीने केक कापला. श्रीमाताजींना श्रीपापाजींनी केक भरवला. श्रीपापाजींना सौ कल्पनादीदी व सौ साधनादीदींनी केक भरवला.त्यावेळी,' बार बार ये दिन आयो', 'हॅपी बर्थ डे टू यु,' हे गीत चालू होते.

नंतर श्रीमाताजींचे जन्मस्थान छिंदवाडा याची माहिती असलेल्या इंटरनेटच्या नवीन साईटच्या प्रोजेक्टचे श्रीमाताजींच्या हस्ते उद्‌घाटन झाले. त्यावेळी श्रीमाताजींच्या उपस्थितीत सर्वांनी हॉलमधील टी.व्ही.वर श्रीमाताजींच्या छिंदवाडा जन्मठिकाणाची सी.डी. सर्वांनी पाहिली.

श्रीपापाजींनी म्युझिक ग्रुपला परत एकदा ,'मेरी माता का करम है' ही कव्वाली म्हणायला सांगितली. सदर कव्वाली संपल्यानंतर श्रीमाताजींचे आपल्या शयनकक्षेत प्रस्थान झाले. सर्वांना केकचा प्रसाद वाटण्यात आला. कार्यक्रम संपला होता त्यावेळी रात्रीचे साधारण १.०० वाजून गेले होते.

● ● ●

# शिव पूजा

## श्री पापाजींचे भाषण (संक्षिप्त)

## १९,एप्रिल,२००७,

जय श्रीमाताजी,

आपल्या सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. आपल्या समोर आपल्या श्रीमाताजी बसल्या आहेत या पेक्षा चांगले दृष्य काय असू शकते. त्यांना बघणे म्हणजे देवाला बघण्यासारखे आहे, स्वर्गाला बघण्यासारखे आहे. मी सर्वात भाग्यवान आहे की मला हे रोज बघायला मिळते. मला तुमच्याशी फक्त एक दोन गोष्टी बोलावयाच्या आहेत. त्या म्हणजे तुम्ही इथे बघाल तर कितीतरी लोक येथे बसले आहेत. ते का आले? का बसले आहेत? कारण की इथे बसलेल्या श्री माताजी आहेत. त्यांनी प्रचंड प्रेम सर्वावर केले आहे. बरोबर आहे ना? आणि आता त्या म्हणतात की,माझ्या मुलांनो, प्रेमळ मुलांनो तिने मागील ३०-३५ वर्ष पळत धडपडत सतत काम केले आहे. जगभर प्रवास केला आहे. अमेरिकेपासून अफ्रिकेला सर्वजगभर.आता मला थोडासा आराम करु दे. मुलांनो आता तुम्ही सर्व मिळून सांभाळा. बोलण्याचे तात्पर्य हे आहे की, आता सर्वांनी सहजयोग पुढे वाढवा.

मी हात जोडून विनंती करतो की, सहजयोग्यांच्यात सर्वाच्या मनामध्ये दुसऱ्याविषयी खरं प्रेम, पवित्र प्रेम सर्वांसाठी असले पाहिजे. ह्याच तुमच्या श्रीमाताजींनी तुम्हा सर्वांना दाखवले आहे की, सर्व जग एक आहे. प्रत्येकाला प्रेम एकसारखे दिले पाहिजे. मला त्या बोलल्या की आपण सर्व सहजयोग्यांनी एकमेकांवर इतके पवित्र प्रेम करा की ते सांगता येणार नाही. कुठल्या प्रकारे एकमेकांत भांडणे नकोत, द्वेष नकोत काही नाही फक्त प्रेम.

या प्रेमाला तुम्ही पुढे वाढवाल त्यावेळी सहजयोगही तुमच्या पुढे वाढेल. बघाल तुम्ही. मी तुमचे दोन मिनीट घेऊन सांगू इच्छितो की, मी लंडन मध्ये काम करीत होतो त्यावेळी, एका पुस्तकाच्या दुकानात गेलो. तिथे चार टेबलं लावली होती. तिथे चार लोक बसत असत.त्यातील एका मुलाकडेच सर्वजण खरेदीसाठी जात असत. बाकी तिघांकडे कोण फिरकतच नसत. मी मॅनेजरला विचारले की तुमच्या दुकानात काय चालले आहे सर्वजण एकाकडेच खरेदीसाठी जात आहेत. उरलेल्या तिघांकडे जातच नाहीत'. तर मॅनेजर म्हणाला, 'हा मुलगा वेगळा आहे'. तर मी म्हणालो का? मॅनेजर म्हणाला की तो काहीतरी सहजयोग असतो ते तो करतो, तो म्हणतो की, मी सहजयोगी आहे. तो इतके प्रेम सर्व गिऱ्हाईकांना देतो की, इतक्या मनापासून बोलतो की, सर्वलोक त्याच्याकडेच जातात'. मी हात जोडले आणि म्हणालो की, 'हे जग श्रीमाताजींचे आहे त्यांनी बनवले आहे'. मी आपल्या सर्वांना हात जोडून विनंती करतो की, आपण या गोष्टीला सांभाळा आणि वाढवा. जगाला याची खूप गरज आहे. बघा बाहेरच्या जगात. सर्वत्र भांडणे, मारामारी, कश्यासाठी हे? एकच देव असू शकतो दोन नाही. सर्व त्यांचीच मुले आहात. तरी हा प्रेमाचा श्रीमाताजींचा संदेश तुम्ही वाढवा, मनापासून वाढवा. सर्वांनी मिळून वाढवा. तुम्ही या देशाला सांभाळून जगाला सांभाळू शकता. मी तुम्हाला हात जोडून सांगतो की, यांचे काम तुम्ही सांभाळा, त्या या इथे बसलेल्या आहेतच.पण तुम्हाला हे काम करावयाचे आहे.

करणारना हे काम? सर्वांनी हात वरती करुन सांगा, प्रॉमिस, श्रीमाताजींना विचारा की तुम्ही आसणार ना, सर्वांना सांगा बरे. धन्यवाद, देव तुमचे भले करो.

●●●

# सहज संग्रहालय उद्‌घाटन सोहळा
## श्री पापाजींचे भाषण (संक्षिप्त)
## भुगाव आश्रम, दिनांक २० मार्च २००७

हे एक श्रीमाताजींनी केलेले विशेष असे कार्य आहे. हे एक असे ठिकाण आहे की, जिथे सहजयोगी तसेच भावी सहजयोगी श्रीमाताजींना पाहण्यासाठी, व त्यांचे शब्द ऐकण्यासाठी एकत्र येऊ शकतात. मला असे वाटते की, ही एक अप्रतिम कल्पना आहे आणि या कल्पनेसाठी, या दृष्टीकोणासाठी मी सर्व सहजयोग्यांचे विशेषत: श्री पुगालिया यांचे अभिनंदन करू इच्छितो. सहजयोगाची ही कल्पना शब्दामध्ये मांडण्यासाठी ती सांगण्यासाठी हा सहजयोगाचा संदेश अनेक ठिकाणी अनेकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या ठिकाणाची पुढे फार मदत होणार आहे. यासारख्या माध्यमांतून तिने ज्या प्रकारे कार्य केले, ज्या प्रकारे सहजयोगाला प्रोत्साहन दिले याची माहिती लोकांपर्यंत पोहचू शकेल. यामुळेच आपणासही प्रेरणा मिळू शकेल आणि अनेक आदर्श सहजयोगी आपण बनवू शकू. कबेल्यामध्येही समसेट नावाचे सहजयोग प्रचार प्रसारामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणारे केंद्र आहे.

या सर्व केंद्राच्या माध्यमातून ज्या कुणाला श्रीमाताजींना वैयक्तिक पाहण्याची इच्छा आहे त्या व्यक्तिंना सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे सहज शक्य झाले आहे आणि त्यामुळेच आपणा सर्वांना ती सर्व ठिकाणे उपलब्ध होऊ शकतात आणि तुम्हाला माहीतच आहे ती स्वत: एक शक्ती आहे आणि तिच्या स्मितहास्याच्या माध्यमातून हा संदेश तुमच्या हृदयापर्यंत पोहोचतो. आणि म्हणूनच तुमच्यासारख्या सन्मानास पात्र असणाऱ्या ट्रस्टी आणि इतर लोकांच्या या नव्या कल्पनेच्या विस्तारासाठी आणि त्यांच्या सहभागासाठी मी तुम्हा सर्वांचा खूप खूप आभारी आहे.

मला याच एकत्रितपणातील सुसंगती फार आवडली. मला असे वाटते आणि आपणा सर्वांनाच हे माहीत आहे की, आजच्या या जगापुढे संपूर्ण मानवजातीपुढे परमेश्वराने हिचे कार्य हे एक सुंदर अनुकरणीय असे उदाहरण ठेवले आहे. आणि म्हणूनच आपणास या कार्याचे फार महत्त्व वाटत आहे आणि हे कार्य होण्याची अत्यंत गरज वाटत आहे.

आजच्या या युगामध्ये सहजयोगाचे कार्य वाढावयास हवे. हा संदेश फक्त माझ्या पत्नीने श्रीमाताजींनी दिलेला आहे म्हणून नाही तर हा संदेश ही आजच्या काळाची गरज आहे किंवा हा संदेश आजच्या काळास अनुरुप आहे.

मी प्रामाणिकपणे तुम्हाला सांगतो की जेव्हा मी वर्तमानपत्रे, बातमीपत्रे वाचतो, ऐकतो तेव्हा मला हे अत्यंत भयावह , धक्कादायक वाटते. अरे देवा! का एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याच्या , त्याच्या बहीण भावंडांच्या जीवावर उठलेला आहे? कारण त्यांच्यामध्ये एक माणूसकी म्हणून दुसऱ्या माणसास समजावून घेण्याची पात्रता फार कमी आहे. जर आपण सर्वजण एकाच सुंदर शक्तीची लेकरे आहोत आपण एकमेकांची बहिण-भावंडे आहोत हे सर्व काही थांबू शकेल, परंतु याच्याशी त्यांचे काहीही देणे घेणे नाही किंवा त्यांना कुणी कसे वागायला हवे हे समजावूनच सांगितले नसावे.

श्रीमाताजी निर्मलादेवी तुम्हा सर्वांच्या आईने अशा प्रकारच्या कार्याचा संदेश सर्व मानवजातीला खूप चांगल्या प्रकारे दिलेला आहे.याच एकजुटपणाचा संदेश तिने प्रेमाने आणि शुद्ध प्रेमाने तुमच्यापर्यंत वाहून नेलेला आहे हे तुमच्या आपल्या झळकणाऱ्या चेहऱ्यावरून समजतेच.

तुमच्यामधील सर्वांना प्रत्येकालाच ती इसासारखे प्रेम देते. तिच्यामध्ये पूर्ण प्रेम,मानवता भरलेली आहे आणि म्हणूनच तिने हे कार्य केले आणि ती हे कार्य करीत आहे. परंतु तुमच्या आत्मसाक्षात्काराच्या या संदेशाचा तुम्ही आदर राखा अशी अत्यंत कळकळीची विनवणी मी तुम्हाला करतो.कारण पूर्वीपासून तुम्ही पाहतच आहात की हेच कार्य ती गेल्या खूप वर्षापासून करीत आहे. या कार्यासाठी तिने फार प्रवास केलेला आहे. मैलोन मैल चाललेली पायपीट केलेली आहे. आगगाडीने, बैलगाडीतूनही तिने प्रवास केला आहे. तिने हे कार्य केले आणि म्हणूनच एका नव्या सुंदर विश्वाची निर्मिती तिने केली.परंतु हे इथेच संपत नाही, आणि म्हणूनच तिला असे वाटते की आता तिच्या मुलांनी हे

कार्य पुढे वाहून न्यावे. मी हे वारंवार सांगतो कारण या कार्याची अत्यंत आवश्यकता आहे, या कार्याचा लोकांनी निश्चय करणे गरजेचे आहे. जर तीने आपले संपूर्ण आयुष्य या कार्यासाठी वेचले तर तुम्ही दररोज दिवसातून २-३ तास देऊ शकत नाही का? नक्कीच देऊ शकता आणि तुमच्याच प्रामाणिक प्रयत्नातून, निशयातून हा तिचा संदेश पसरणार आहे.

अशाच सुंदर जगाला पाहण्यासाठी ती नक्कीच इथे असेल. परंतु जगातील लोकांना हे सुंदर सत्य समजू शकत नाही कारण याच्याशी त्यांचे देणे-घेणे नाही किंवा कोणत्या प्रकारे त्याची कृती योग्य बनू शकते हे त्यांना माहीत नसावे. तुम्हाला माहीत आहे का इथे उपस्थित असणाऱ्या सर्वांच्या कल्पना, विचार भिन्न असूनही ते एक आहेत आणि आता बहीण -भावंडे म्हणून एकत्र बसलेली आहेत कारण ती एकमेकांची बहिण-भावंडे आहेत हे दृष्य किती आनंददायक,अल्हाददायक,आश्चर्यकारक चित्र आहे. लक्षात घ्या की जर सहजयोगीच अस्तित्वात नसते तर समाजाची एक चांगली बाजूच अस्तीत्वात नसती. वेगवेगळ्या देशांमधील वेगवेगळ्या विचारांची वेगवेगळी माणसे परंतु ती सर्वजण एक आहेत कारण ती एकाच आईची श्रीमाताजींची मुले आहेत. हे एक आश्चर्य नाही काय?

आजच्या या आधुनिक जगाच्या इतिहासामध्ये अशा प्रकारचे सुंदर उदाहरण/सुंदर चित्र मला अजूनतरी माहीत नाही आणि म्हणूनच तुम्ही याहीपलीकडे जावे असे मला वाटते. तिला तुम्ही तुमच्या हृदयामध्ये, मनाच्या अत्यंत खोल कप्प्यामध्ये ठेवा आणि या कार्यासाठी पुढे जा अशी मी तुम्हाला कळकळीची विनंती, विनवणी करतो. कारण सध्याच्या जगासाठी संपूर्ण मानवजातीला वाचविण्यासाठी हा प्रेम,एकोप्याचा संदेश पसरविण्याचे हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. तुमच्या कार्यामध्ये तुम्हाला सर्वतोपरी यश मिळो अशी मी सदिच्छा करतो. मला अशी खात्री आहे की, तुम्ही अशाच प्रकारचे नवीन विश्व सर्वत्र पहाल. भिन्न भिन्न जातीच्या राष्ट्रांच्या , धर्मांच्या लोकांचा एकच फक्त एकच ईश्वर असणाऱ्या लोकांचा समूह अगदी प्रेमाने एकत्र राहत असलेले तुम्ही पहालच! यासाठी तुम्हाला यश मिळो! अशीच मी सदिच्छा करतो. सर्वांचा आभारी आहे.

● ● ●

## सहज संग्रहालय उद्‌घाटन समारंभ (वृत्तांत)
### निर्मल नगरी, २० मार्च २००७

सहज संग्रहालयाचे उद्‌घाटन श्री पापाजींच्या हस्ते झाले. सदर कार्यक्रमासाठी श्री पापाजी व सौ कल्पनादीदी यांचे निर्मल नगरीत ७.०० च्या सुमारास सनई चौघडा व तुतारीच्या मंगल आवाजात आगमन झाले.श्रीपापाजी व सौ कल्पनादीदींचे स्वागत करण्यात आले. त्यावेळी काही विदेशी सहजयोग्यांनी सदर कार्यक्रमानिमित्त भाषण केले. त्यानंतर आदरणीय श्री पापाजी यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.(अंकात स्वतंत्र दिलेले आहे.)

प्रथम श्रीपापाजींच्या हस्ते सहज संग्रहालयाचे उद्‌घाटन फित कापून झाले. श्रीपापाजी व सौ कल्पनादीदींनी संग्रालयातील सर्व फोटोंचे तसेच ठेवलेल्या वस्तुंचे अतिशय बारकाईने निरीक्षण केले.त्यावेळी श्रीमाताजींची १०८ नावे व फोटो असलेल्या फ्रेमचे विषेश कौतुक केले. तसेच श्रीमाताजींबरोबरच्या फोटोतील लहान मुलांना सौ कल्पनादीदीं ओळखून श्री पापाजींना माहिती सांगत होत्या. त्यानंतर श्री पापाजींच्या हस्ते सी.डी. लायब्ररीचे उद्‌घाटन झाले. त्यावेळी श्रीपापाजी व सौ कल्पनादीदीनी रिमोट चालू करून श्री माताजींनी बैलगाडीतून प्रवास केलेली सी.डी. पाहिली. त्यानंतर श्रीपापाजी व सौ कल्पनादीदींच्या हस्ते पुस्तकांच्या लायब्ररीचे उदघाटन झाले.


त्यानंतर श्रीपापाजी व सौ कल्पनादीदींचे परत प्रतिष्ठानकडे प्रस्थान झाले.

● ● ●

# शिव पूजा, १९ मार्च २००७













# वाढदिवस पूजा, २१ मार्च २००७













# ईस्टर पूजा, ८ एप्रिल २००७











## अक्षयतृतीया पूजा, १९ एप्रिल २००७







## श्रीमाताजींचे प्रतिष्ठानमधून प्रस्थान, २० एप्रिल २००७









## श्रीमाताजी व श्रीपापाजी लग्नाचा ६०वा वाढदिवस समारंभ
### प्रतिष्ठान, दिनांक ७,एप्रिल२००७
### (वृत्तांत)

प्रतिष्ठानच्या गेटलगत नव्याने खास या कार्यक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या लॉनवर सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. गेटच्या रस्त्याच्या बाजूला लॉनकडे तोंड करून स्टेज तयार केले होते. स्टेजवर अतिशय सुंदर असा देखावा सादर केला होता. स्टेजच्या दोन्ही बाजूला कलाकारांसाठी दोन छोटे स्टेज तयार केले होते. स्टेजच्या डाव्याबाजूच्या स्टेजवर श्री व सौ आपटे, श्री सुब्रमण्यम आणि सहकारी बसले होते. तर उजव्या बाजूच्या स्टेजवर हैद्राबादचे प्रसिद्ध कव्वाल यांना बसविण्यात आले होते. दोन्ही लहान स्टेजच्या मागच्या बाजूला दोन स्क्रिन लावले होते. तर स्टेजवर एक आकर्षक टिव्ही स्क्रिन लावला होता. स्टेजच्या समोरच्या बाजूला व्ही व्ही आय पीं साठी सुरवातीच्या २/३ रांगा मांडल्या होत्या. त्यामागे गोल आकर्षक सजविलेल्या टेबलांभोवती बसण्याची व्यवस्था असलेली अनेक टेबले ठेवली होती. त्याच्या मागच्या बाजूला पाहुण्याच्या खाण्यापिण्याची व्यवस्था होती. शेवटी बर्फाच्या लाद्यांवर ६० अक्षरे कोरलेले त्याच्या मागे मोठ्या पडद्यावर ६० वा वाढदिवस समारंभ लिहिलेले तसेच सर्वत्र आकर्षक विद्युत रोषणाई केलेली तर सर्व कार्यकर्ते पांढऱ्या शुभ कपड्यात डोक्याला फेटे बांधून रुबाबदारपणे येणाऱ्या पाहुण्याचे सनईच्या मंगल धुनमध्ये स्वागत करत होते.

साधारण ८.०० च्या सुमारास श्रीमाताजी व श्रीपापाजींचे त्यांच्या क्षयनकक्षातून कार्यक्रमाच्या ठिकाणी आगमन सुरू झाले. त्यावेळी स्पिकरवर श्री व सौ आपटे मंगलाष्टका गात होते.त्यामुळे अतिशय वेगळे वातावरण तयार झाले होते. श्रीमाताजी व श्री पापाजींचे स्टेजवर आगमन होत असताना लहान मुले त्यांच्या चरणावर फुले वाहत होती.

श्रीमाताजींचे व श्री पापाजींचे स्टेजवर आगमन झाले .त्यांच्या सोबत श्रीमाताजींचे ज्येष्ठ बंधु श्री एन.के.पी.साळवे (माजी क्रिकेट कंट्रोल बोर्ड अध्यक्ष) तसेच श्री डुगरपुरकर (क्रिकेट कंट्रोल बोर्ड सदस्य) स्टेजवर त्यांच्या बाजूला बसले होते. सुरवातीला श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण केला. कार्यक्रमाची सुरवात श्री राजेश शहा यांनी छोटीशी प्रस्तावना करून केली. त्यानंतर काही विदेशी पाहुण्यांनी आपल्या शुभेच्छा दिल्या.श्रीमाताजींना व श्री पापाजींना सौ कल्पनादीदी व सौ साधनादीदींनी बुके अर्पण केला.तसेच श्री डुगरपुरकर आणि श्री एन.के.पी.साळवे यांना जावई श्री प्रभात व रोमेल यांनी बुके अर्पण करून श्रीमाताजी व श्री पापाजींना शुभेच्छा दिल्या

त्यानंतर श्रीमाताजींचे मोठे बंधू श्री एन.के.पी.साळवे यांनी श्रीमाताजी व श्री पापाजींना शुभेच्छा देताना सांगितले की, श्री पापाजी हे माझ्या बहिणीचे पती असले तरी त्यापूर्वीपासूनचे ते माझे फार जवळचे मित्र आहेत. तसेच या दोघांच्या लग्नाचा ७५ वा वाढदिवस यापेक्षा मोठ्या प्रमाणावर साजरा केला जावा अशा शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर श्रीमाताजींच्या बहिणीचे स्टेजवर आगमन झाले. त्यानंतर श्रीमाताजी व श्रीपापाजी यांच्या जीवनावर आधारीत खास तयार केलेली सीडी सगळ्यांना दाखविण्यात आली. त्यामध्ये श्रीमाताजी व श्री पापाजी यांच्या बालपणापासून ते आज पर्यंतच्या घटना दाखविल्या. त्यामध्ये श्रीपापाजी, श्रीमती कल्पनादीदी ,श्रीमती साधनादीदी यांची मुलाखत दाखविल्यामुळे सदर सीडी फारच सुंदर वाटली. संपूर्ण सीडी पहाण्यासाठी स्टेजवर स्वतंत्र मोठा स्क्रिन असलेला टेलिव्हीजन व बाजूला दोन स्वतंत्र पडदे लावले होते.

त्यानंतर श्रीमाताजींचा संपूर्ण परिवार स्टेजवर आमंत्रित करण्यात आला. त्यात श्रीमाताजींच्या दोन्ही मुली त्यांचे पती व नात जावई सर्वजण स्टेजवर जमले. श्रीमाताजींनी व श्री पापाजींनी सर्वांच्या टाळ्यांच्या प्रचंड आवाजात ६० व्या वाढदिवसाचा केक कापला. त्यावेळी आकाशात मोठ्या प्रमाणावर फटाक्याची

आतषबाजी चालू होती. श्रीमाताजींना श्रीपापाजींनी केक भरविला. त्यानंतर श्रीपापाजींनी त्यांच्या स्टेजवरील त्यांच्या सर्व नातलगांना केक भरविला. त्यानंतर दोघांना मुली नी व सर्व नातलगांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर श्रीपापाजींनी जमलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानत छोटेसे भाषण केले.(स्वतंत्र दिले आहे) त्यानंतर खास हैद्राबादहून आलेल्या कव्वालांची कव्वाली झाली. त्यावेळी श्री एन.के.पी.साळवे साहेबांनी श्रीमती कल्पनादीदींना स्टेजवर बोलावून श्रीमाताजीं व श्री पापाजींवरुन पैसे ओवाळून कव्वाल यांना देण्यास सांगितले. श्रीमती कल्पनादीदींनी कव्वालांना पैसे दिल्यानंतर श्रीमाताजीच्या जवळच्या नातलगांनी कव्वालांना पैसे दिले. त्यानंतर जमलेल्या पाहुण्यांनी कव्वालांना पैसे दिले. कव्वाली संपल्यानंतर श्रीमाताजी, श्री पापाजी, श्री साळवे साहेब आणि त्यांचे पाहुणे कॉन्फरन्स हॉलकडे गेले. त्याठिकाणी श्रीमाताजी व श्री पापाजी थोडावेळ पाहुण्यासोबत बसले. त्यावेळी कॉन्फरन्स हॉलमध्ये मांडलेले फोटो, पदके, सर्टफिकेट्स पहात होते.

बाहेरच्या बाजूला सर्व पाहुण्यांसाठी जेवणाची व्यवस्था केली होती त्याचा आनंद सर्व पाहुणे घेत होते.एकूण सर्व वातावरण पहाता स्वर्ग पृथ्वीवर आवतरल्यासारखा वाटत होता.

जय श्रीमाताजी.

● ● ●

## श्रीमाताजी व श्री पापाजी लग्नाचा ६०वा वाढदिवस

### प्रतिष्ठान, दिनांक ६ एप्रिल २००७

### (वृत्तांत)

लग्नाच्या वाढदिवसाची दिनांक ७एप्रिल २००७ ची सुरवात म्हणजे दिनांक ६ एप्रिल २००७ रोजी रात्री १२.०० वाजता श्रीमाताजींच्या क्षयनकक्षेत केक कापून करण्यासाठी प्रतिष्ठानवर मोठ्या प्रमाणात तयारी सुरू होती.

रात्री १२.०० नंतर सर्वजण श्रीमाताजींच्या क्षयनकक्षात जमले. त्यावेळी श्रीमाताजी व श्रीपापाजीं सोबत सौ कल्पनादीदी व सौ साधनादीदी उपस्थित होत्या. प्रथम श्रीमाताजींना फुले अर्पण करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या चरणावर हार अर्पण केला. त्यानंतर त्यांच्यासमोर एक सुंदर केक मांडण्यात आला. श्रीमाताजीं व श्रीपापाजीं दोघा उभयतांनी केक कापून लग्नाच्या ६० व्या वाढदिवसाची सुरवात केली. त्यावेळी सिंथेसायझरच्या मदतीने ' तेरे मेरे सपने अब एक संग है तु जहा भी ले जाये अब हम संग है' जे जुने हिंदी गीत सौ कल्पनादीदी ,सौ साधनादीदी, श्री पुगालिया आणि सर्व उपस्थित सहकारी गात होते. त्यामुळे एक वेगळीच वातावण निर्मिती झाली होती. श्री पापाजींनी श्रीमाताजींना केक भरविला. त्यानंतर श्रीमाताजींनी श्रीपापाजींना केक भरवला.

श्री पापाजींनी जुन्या आठवणींना उजाळणी देत छोटेसे भाषण केले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, '६० वर्षापूर्वी आमचे लग्न एवढे सोपे नव्हते कारण आम्ही दोघे वेगवेगळ्या वातावरणातले होतो. पण श्रीमाताजींनी मला खूप सांभाळून घेतले. माझ्या लहान लहान आवडी जपल्या. माझ्या खाण्याची काळजी सतत घेत असत. सतत माझ्या पाठीशी उभ्या राहिल्या.मी अतिशय भाग्यवान की मला श्रीमाताजी पत्नी म्हणून मिळाल्या' त्याचवेळी त्यांनी एक हिंदी शेर सांगितला. तसेच त्याचा इंग्रजीतील अर्थ सांगितला.

त्यानंतर श्रीमाताजींना व श्री पापाजींना, श्री पुगालिया यांनी सर्व सहजयोग्यांच्या वतीने अतिशय सुंदर असे प्रेझेंट दिले. त्यानंतर ऑस्ट्रेलिया तर्फे श्री हरी गायकवाड आणि सहकाऱ्यांनी गिफ्ट दिले. त्यानंतर उपस्थित असलेल्या सर्वांना केक वाटण्यात आला. त्यानंतर श्रीमाताजींचे सौ कल्पनादीदी व सौ साधनादीदींच्या सोबत फोटो काढण्यात आले. आजचा कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे १.०० वाजले होते.

● ● ●

## श्रीमाताजींच्या लग्नाच्या ६० वा वाढदिवसाच्या दिवशीचे श्रीपापाजींचे भाषण प्रतिष्ठान, दिनांक ७ एप्रिल २००७ (संक्षिप्त)

आजच्या या प्रसंगी भावनांशिवाय जग अपुरे आहे ही सर्वात अविस्मरणीय संध्या आहे आणि या प्रसंगाची सुरवात मला माझे म्हेवणे श्री एन.पी.के. साळवे यांचे आभार मानून करायला आवडेल. सर्व गोष्टींसाठी मी त्यांचा आभारी आहे. त्या सर्व गोष्टीपैकी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्यामुळेच मला त्यांच्या बहिणीचा (श्रीमाताजींचा)सहवास लाभला. तिच्यामुळेच माझ्या एका नवीन आयुष्याची सुरुवात झाली आणि एका नवीन जगामध्ये मला प्रवेश मिळाला.

श्रीमाताजींकडे पाहून म्हणाले की, मला माहीत आहे मी भूतकाळामध्ये न जाता सद्यस्थितीमध्ये रमण्याबाबत तुझी इच्छा आहे. परंतु माझी फक्त एकच गोष्ट व्यक्त करण्याची इच्छा आहे की, लग्नानंतर माझ्या आयुष्याला एक नवीन वळण लागले. आम्ही फार वेगळ्या परिस्थितीमधून आलेलो होतो आणि मी एकत्र कुटुंबामध्ये राहत होतो. आणि आपल्या श्रीमाताजी स्वातंत्र्यासाठी लढणारी एक व्यक्ती होती. परंतु तरीही आम्हा दोघांमध्ये भारताची सेवा करण्याचा एक समान दृष्टिकोन होता. हा दृष्टिकोन थोडासा कमी माझ्याकडे होता. परंतु प्रामाणिकपणे सांगायचे तर मला यातला सखोल दृष्टिकोन या शेजारी बसलेल्या स्त्रीकडूनच मिळाला. श्री पापाजी श्रीमाताजींकडे पहात म्हणाले की, 'हे सत्य आहे.' श्रीमाताजींनी प्रश्नार्थक दृष्टीने पापाजींकडे पहात होत्या. श्रीपापाजी म्हणाले की, मी तीचे ऐकणार नाही. तीने माझ्या आयुष्याला एक नवीन वळण दिले हे पूर्णत: सत्य आहे. माझी माझ्या देशावर निष्ठा होतीच परंतु हृदयापासून पूर्णत: मी माझी कर्तव्ये आणि जबाबदाऱ्याबद्दल समर्पित होतो. ती माझे आयुष्य प्रकाशमय करणारी ज्योती आहे. तिने दिलेल्या मुलांच्या संपत्तीमुळेच मी माझ्या आयुष्यावर राज्य करु शकलो. ती माझ्या आयुष्यातील एक उदार व्यक्ती ठरली. म्हणून जे काही माझ्या आयुष्यामध्ये घडले त्यासाठी मी हिचा अभारी आहे. तिला मी या सत्यस्थितीची कबुली देतो.

तू मला थांबायला सांगशील. पण मी सर्वांना सत्यच सांगणार आहे, तुझ्या या भक्कमपणे माझ्या पाठीशी उभ्या रहाण्यामुळेच मी आज माझ्या आयुष्यामध्ये उभा आहे हे सत्य आहे. मी माझ्या देशाची सेवा, जगाची सेवा माझ्या क्षमतेनुसार जास्तीतजास्त करण्याचा प्रयत्न केला. पण माझ्यापेक्षाही जास्त सेवा करण्यामध्ये हिचा जास्त सहभाग आहे ही गोष्ट उल्लेखनीय आहे कारण,तिनेच इथे एकत्र जमलेल्या नवीन विश्वाची निर्मिती केलेली आहे.

आजच्या कार्यक्रमासाठी भारतातील लोकांव्यतिरिक्त परदेशी लोक वेगवेगळ्या देशांतून बऱ्याच अडचणी पार करीत प्रवास करुन इथे या कुटुंबामध्ये आलेले आहेत. त्या सर्वांना या गोष्टीची कल्पना आहे की, ते सर्वजण हिच्याच मुले आहेत. याव्यतिरिक्त बाकी सर्व गोष्टी ते विसरुन गेलेले आहेत. ती त्या सर्वांची आई आहे आणि सर्वजण तिची मुले आहेत. ती प्रत्येक मुलावर स्वत:च्या पोटी जन्म घेतलेल्या मुलाप्रमाणे प्रेम करते. एकच ईश्वर एकच मानवी कुटुंब हाच या जगाचा अर्थ आहे आणि याचीच तिने निर्मिती केली आहे. तिने एक अशक्य गोष्ट केलेली आहे. जर तुम्ही इथे जमलेल्या लोकांशी बोललात तर ते सांगतील की, हीच ती आई आणि हाच तो ईश्वर आहे. तिने तिच्या पूर्ण प्रेमाच्या भावनेने या सुंदर आणि आश्चर्यजनक अशा जगाची निर्मिती केलेली आहे हे मलाही माहीत आहे.श्रीमाताजींकडे पहात पापाजी पुढे म्हणाले की, आपण जे काही केलेले आहे ते मी सर्वांना सांगत आहे आणि हे सांगणे आवश्यक आहे. तू जगासाठी काय केले, तू जगाला या विश्वाला एक बनवले आहेस ही गोष्ट जगाला माहित पाहिजे. जर तुम्ही वर्तमानपत्रे आणि बातम्या पहात असाल तर या जगामध्ये लोक परस्परांशी भांडत आहेत मतभेद करीत आहेत आणि इथे उपस्थित असलेली स्त्री सांगत आहे की , हे सर्व चुकीचे आहे. शक्ती ही एकच असू शकते. दोन नाही. जास्त शक्त्या असू शकतात का? नाही.

शक्तीच्या या वेगवेगळ्या रुपावरुनच लोक एकमेकांमध्ये भांडत आहेत. एकच शक्ती आहे आणि आपण सर्वजण त्या शक्तीची मुले आहोत आणि हे सत्य तिने सिद्ध केलेले आहे. त्याच शक्तीने त्या मुलांची निर्मिती केलेली आहे. ती मुले गोरी, काळी, उंच, बुटकी, आशियाची, लॅटीन अमेरिकेची, युरोपाची असतील परंतु तरीही हे सर्वजण एकाच कुटुंबाचे सदस्य म्हणून इथे एकत्र आलेले आहेत. तुम्हाला माहीत आहे मी जेव्हा यु.के.

किंवा वेगवेगळ्या देशांमध्ये जातो तेव्हा माझ्यासमोर बसलेल्या समूहामध्ये अनेक धर्माचे लोक उपस्थित असतात आणि ही सर्वजण सहजयोगी तिचीच मुले असतात. बंधू आणि भगिनींनो मी तुम्हाला सांगतो की, ही एक विलक्षण अशी कामगिरी आहे. आणि या कामगिरीचा भविष्यामध्ये विस्तार प्रगती होणे गरजेचे आहे. जगाची ही अत्यंत गरज आहे. (श्रीमाताजी म्हणाल्या बास करा) - आज मला या लोकांशी बोलण्याची संधी आलेली आहे. बर ठीक आहे. आता मी बोललेलो आहे मी प्रामाणिकपणे तिच्या कार्याचा तुमच्यासमोर उल्लेख केलेला आहे. आणि म्हणूनच मी आज तुम्हाला सांगत आहे एक मानवी कुटुंब एक प्रेमळ कुटुंब इतकेच.लखनऊ युनिव्हरसीटीतील माझ्या मित्राच्या उपस्थितीबद्दल मी त्याचे आभार मानतो. तो अत्यंत प्रेमळ मित्र की ज्याने इतरांपेक्षा माझ्यासाठी खूप चांगल्या गोष्टी केलेल्या आहेत. निरनिराळ्या देशामधून आलेल्या तुम्हा सर्वांचेही मला आभार मानावेसे वाटतात की जे आमच्या आनंदामध्ये सहभागी होण्यासाठी इथे आलेले आहात. तसेच मला दोन व्यक्तींचे आभार मानायचे आहेत त्यापैकी एक म्हणजे श्री डुगरपूरकर ते एक अतिशय सुंदर व्यक्तिमत्त्व आहेत, आणि म्हणून मला त्यांचे आभार मानायचे आहेत. यावेळी मला आणखी एका व्यक्तीची आठवण येते ती म्हणजे, डॉ नागवेंद्रसिंग की जे एक खूप चांगले व्यक्ती होते. ते माझे वरिष्ठ आय.सी.ए. चे सदस्य असूनही माझ्यावर ते धाकट्या भावाप्रमाणे प्रेम करीत होते. ते एक मनुष्य म्हणून फारच चांगले होते. ते मला त्यावेळी मुख्यमंत्र्याकडे घेऊन जात असत आणि या व्यक्तीला ख्रिश्चनांबद्दल जास्त माहिती आहे असे धाडसाने सांगत असत. जगातील कोणताही वरिष्ठ असे करु शकणार नाही. अशा प्रकारे ते प्रचंड व्यक्तीमत्त्व होते. त्यांना ख्रिश्चनांबद्दल अशा प्रकारची कळकळ होती हे मला आठवत आहे.

इथे बसलेल्या आर्मीमधून आलेल्या अशाच एका मित्राचेही मला आभार मानावेसे वाटत आहे. की जे महान शिक्षण घेतलेले आहेत. असे कुणी तरी की ज्यांचा मला आदर वाटतो. मी त्यांचे कौतुक करतो की त्यांनी त्यांचे आयुष्य आणि वेळ एका चांगल्या कामासाठी घालवला. मी त्यांना माझ्या भावासारखेच मानतो. मुंबईवरुन आज या प्रसंगासाठी उपस्थित आहेत. मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. या सर्व चांगल्या गोष्टीसाठी कार्यासाठी श्री राजेश शहा यांचाही आभारी आहे. तसेच श्री प्रभात आणि श्री रोमेल यांच्या चांगल्या भावनांसाठी मी त्यांचा आभारी आहे. माझे जावई श्री प्रभात यांनी सुंदर गोष्टींचा उल्लेख केला. आमच्या कुटुंबियांना या दोघांचा खूप अभिमान वाटतो.

प्रभात आणि रोमेल हे दोघेही खूप चांगल्या प्रेमळ व्यक्ती आहेत. अखेरीस मी अशा दोन व्यक्तींचे साधना व कल्पनाचे आभार मानतो की जे आमचे आयुष्य आहेत. मी हे शेवटी नमूद करतो कारण ते आमच्या हृदयाचा अविभाज्य घटक आहेत. आमच्यासारख्या दोन्ही मुली सर्वांना लाभो अशी माझी इच्छा आहे. की ज्या मुली त्यांच्या पालकांशी, पतीशी, मुलांशी पूर्णत: निष्ठावान आहेत ते चांगुलपणाचे आदर्श आहेत. मी या गोष्टींचा इतर कुठेही उल्लेख करीत नाही परंतु आजच्या या प्रसंगी मला त्यांचा उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी माझ्यावर तसेच माझ्या पत्नीवर खूप प्रेम केलेले आहे. खूप आधार दिलेला आहे. कल्पना आणि साधनाशिवाय आमचे आयुष्य अपूर्ण असते. म्हणून तुम्ही जेथे कुठे असाल कृपया माझ्या कळकळीच्या भावनांचा स्विकार करा. तसेच या दोघींनी आम्हाला सुंदर अशी नातवंडे,पतवंडे दिलेली आहेत. म्हणून आमचे खूप खूप आनंदी कुटुंब आहे. या कुटुंबाचे बीजरोपण माझ्या पत्नीने केलेले आहे आणि त्या बिजाला आता सुंदर असा वृक्ष झालेला आहे. आम्हाला खूप छान जावई, नाती व नातजावई कुणाल व हेम मिळालेले आहेत की जे इथे उपस्थित आहेत. जर आराधना, अनुपमा, असत्या तर खूप छान झाले असते. सोनू इथे उपस्थित आहे. माझ्या मुलांनो तुम्ही कुठेही असलात तरीही आज इथे या प्रसंगाला उपस्थित आहात.

तिने लावलेल्या बीजाचा आज एक खूप सुंदर वृक्ष झालेला आहे. म्हणून बंधु-भगिनींनो तुम्हा उपस्थितीबद्दल मी तुमचे कळकळीचे आभार मानतो. मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे विषेशत: श्री पुगालिया यांचा आभारी आहे. असली इतकी सुंदर व्यवस्था केलेली आहे. पुन्हा एकदा सर्व परदेशी पाहुण्यांचे मी आभार मानतो. आम्हाला तू (श्रीमाताजी)हवी आहेस कारण तू आमच्या हृदयात निवास करतेस. बंधू -भगिनींनो कृपया माझ्या कळकळीच्या आभाराचा स्वीकार करा, आभारी आहे. तसेच मी माझ्या म्हेवणीच्या मुलाचेही एक अतिशय सुंदर फिल्म बनविल्याबद्दल आभार मानतो.तुम्हा सर्वांचे पुन्हा एकदा आभार मी मानतो.

● ● ●

## अक्षयतृतीया पूजा

### प्रतिष्ठान,पुणे दिनांक १९,एप्रिल २००७ (वृत्तांत)

प्रतिष्ठानमधील कॉन्फरन्स हॉलमध्ये पूजेचे आयोजन केले होते. साधारण ८.०० च्या सुमारास श्रीमाताजींचे आगमन झाले त्यांच्या सोबत श्रीपापाजी वश्रीमती साधनादीदी होत्या. सुरवातीला श्रीमाताजींची आरती झाली त्यावेळी आगत स्वागत हे गीत झाले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर श्री पराग राजे आणि श्री राजेंद्र पुगालिया यांनी श्रीमाताजींच्या चरणावर फुले अर्पण करून पूजा केली.

त्यावेळी मुंबई म्युझिक ग्रुपने, अपनी पनाह मे हमे रखना हे भजन सादर केले. त्यानंतर श्री मुखिराम आणि सहकाऱ्यांनी, जागो सबेरा आया है हे भजन म्हटले. त्यानंतर श्रीमती साधनादीदींनी श्रीमाताजींना ओटी अर्पण केली. त्यानंतर श्रीमाताजींना नैवेद्य दाखविण्यात आला. तसेच पेढे, फुटाणे, मिठाईचा प्रसाद दाखविण्यात आला. त्यावेळी मुखिराम यांनी, ऐसा दो महे ज्ञान रहे तेरे चरणो मे ध्यान माता निर्मलादेवी, हे भजन सादर केले,

त्यानंतर मुंबई ग्रुपने, छाप तिलक सब छिनी मोसे नैना मिलाईके ही कव्वाली म्हटली. त्यावेळी श्रीमाताजींना इंटरनॅशनल गिफ्ट सादर केले. त्यानंतर कलकत्याचे गिफ्ट सादर केले. त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या सहजयोग्यांनी गिफ्ट सादर केले. त्यावेळी महामाया महाकाली हे मुखिराम यांनी भजन सादर केले. श्रीमाताजींची आरती झाली. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर वाहिलेली फुले परत काढत असताना मुखिराम यांनी , गुरुओं की गुरु, नाम रखले तु माँ का नाम रखले हे भजन सादर केले.त्यानंतर श्रीमाताजी आपल्या शयनकक्षात गेल्या. जमलेल्या सर्व सहजयोग्यांना प्रसाद वाटण्यात आला. ● ● ●

## श्रीमाताजींचे प्रतिष्ठान मधून प्रस्थान

### दिनांक २०, एप्रिल २००७ (वृत्तांत)

सकाळी ११.४५ च्या सुमारास श्रीमाताजींच्या चरणावर श्री पुगालिया यांनी हार अर्पण केला. त्यानंतर त्यांची आरती केली. त्या अतिशय उत्साहात, आनंदात त्यांच्या गाडीत बसल्या. त्यावेळी सर्वांना नमस्कार केला आणि आशीर्वाद दिले. त्यानंतर श्रीमाताजींची गाडी १२.१५ च्या सुमारास प्रतिष्ठानमधून बाहेर निघाली.

श्रीमाताजींच्या गाडीत त्यांच्या सोबत श्रीपापाजी, श्रीमती साधनादीदी आणि श्री पुगालिया होते. त्यांच्याशी अनेक विषयांवर गप्पा मारत श्रीमाताजींची गाडी दुपारी २.३० च्या सुमारास एअरपोर्ट जवळील हॉटेल जवळ विश्रांतीसाठी थांबली. हॉटेलमध्ये प्रवेश करतानाच मावळ्याचा वेष परिधान केलेले दोघेजण वाद्य वाजवित होते. श्रीमाताजीं अतिषय आनंदात, उत्साहात गाडीतून उतरल्या. त्यावेळी दुतर्फी हिरव्या साड्या नेसलेल्या मुली श्रीमाताजींच्या वाटेवर फुले वाहण्यासाठी उभ्या होत्या. त्यानंतर श्रीमाताजींची हॉटेलमधील विश्रांतीगृहात आरती केली आणि त्यांच्या चरणावर हार अर्पण केला, तर श्री पापाजींना बुके देण्यात आला. त्यानंतर श्रीमाताजींनी साधारण ५.४५ पर्यत हॅाटेलमध्ये विश्रांती घेतली. त्यानंतर त्या विमानतळाकडे निघाल्या. त्यावेळी त्यांच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला.

श्रीमाताजी ६.०० च्या सुमारास एअरपोर्टवर पोचल्या. त्यानंतर व्ही.आय. पी. बोर्डींग रुममध्ये श्रीमाताजी अर्ध्या तासासाठी थांबल्या. त्यावेळी श्रीमाताजी अतिशय प्रसन्न व आनंदी दिसत होत्या. त्यावेळी श्रीमाताजींच्या चरणावर विमानतळावरील सहजयोगी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हार/बुके अर्पण केले. त्यानंतर साधारण ६.३५ च्या सुमारास श्रीमाताजी विमानाकडे निघाल्या.त्या प्रथम दुबई व नंतर कबेला येथे जाणार आहेत. ● ● ●

## ईस्टर पूजा, प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण, कलकत्ता, एप्रिल ९५ (सारांश)

ईस्टर हा फार अर्थपूर्ण दिवस आहे; फक्त ख्रिस्तांसाठी नाही पण आपल्या सर्वांसाठी. कारण सर्वात महत्त्वाचा दिवस म्हणजे जेव्हा पुनरुत्थान होते. ख्रिस्तांचे पुनरुत्थान हा ख्रिस्तनीतीचा संदेश आहे. क्रॅासचा नव्हे. पुनरुत्थान शक्य आहे. आणि याच्याशिवाय आज्ञाचक्रांच्या पार होणे शक्य नव्हते. त्यांचे आयुष्य फारच कमी होते याबद्दल शंका नाही आणि एका अर्थाने ते साडेतीन वर्षच होते असं आपण म्हणू शकतो. ते भारतात आले आणि शालिवाहनांची आणि त्यांची भेट झाली. शालीवाहनाने त्यांचे नाव विचारल्यावर ते म्हणाले माझे नाव. ''इसामशी'' आणि पुढे म्हणाले ''मी म्लेंच्छ लोकांच्या देशातून आलो, म्लेंच्छ (मल इच्छा) म्हणजे वाईट इच्छा. अशुद्ध व मलीन इच्छा. म्हणून त्या देशात कसं रहायचं? आता हाच माझा देश'' पण शालिवाहनाने त्याला परत स्वदेशात जाऊन तिथल्या लोकांना वाचवायला आणि त्यांना ''परम निर्मल तत्त्व सांगायला सांगितले'' मग तो परत आपल्या देशात गेला आणि अवघ्या साडेतीन वर्षात त्याला सुळावर जावे लागले.

मरते समयी त्यांनी 'क्षमे' बद्दल खूप सुंदर गोष्टी सांगितल्या.पण सरतेशेवटी ते म्हणाले,'माता आली आहे पहा'. म्हणजे तुम्ही आईची वाट पहा. तसंच हयात असताना ते असेही म्हणाले,''मी तुमच्यासाठी होली घोस्ट पाठवणार आहे.जे तुम्हाला आराम देतील, उपदेश करतील आणि तुमचा उद्धार करतील म्हणजेच तुमचं पुनरुत्थान होईल. ते हे सर्व म्हणाले कारण त्यांना पुढं काय होणार आहे व कसं होणार आहे हे सर्व माहीत होते. ते असेही म्हणाले की,'माझ्याबद्दल तुम्ही काहीही बोललात किंवा माझ्या विरोधात काहीही केलत तरी चालेल पण होली घोस्टच्या विरोधात तुम्ही गेलात तर ते मी कदापि सहन करणार नाही. काय वाटेल ते झालं तरी ते चालू देणार नाही.'आणि हे खरंही आहे, होली घोस्टच्या विरोधात जाणं फारच धोकादायक आहे याबद्दल काही शंका नको. माझ्याकडून तशी भीती नाही, पण या देशात देवता मात्र तितक्याच रागिट आहेत.

सहजयोगामध्ये तुमच्या शरीरासकट तुमचं पुनरुत्थान झालं आहे. यापूर्वी तुम्ही परमात्म्याच्या सर्वव्यापी शक्तीबरोबर जोडले गेला नव्हता आणि तुम्ही जे काही करत होता ते मनाने या भावनेने करत होता. तुम्ही तुमच्या भावना, इच्छा, कर्तव्य व अहंकार यामध्ये डुबून गेला होता.आत्मसाक्षात्कारांनंतर तुम्ही किती स्वतंत्र, मुक्त आहात ते तुम्हालाच जाणवलं आहे.तुमचं सारं व्यक्तिमत्त्व उन्नत झालं आहे. ख्रिस्तांनी अनेक उदाहरणांतून हेच सांगितले आहे की तुम्ही 'स्वत:ला ओळखा' तुम्ही स्वत:ला ओळखल्याशिवाय तुमचं पुनरुत्थान होणार नाही हे त्यांना माहीत होते. पण सहजयोग याच्या अगदी उलट आहे. तुमचे आधी पुनरुत्थान होते आणि मग तुम्ही स्वत:ला ओळखता ही साक्षात्कार होण्याची आगदी सहज व सुंदर क्रिया आहे.

ख्रिस्तांच जीवन पाहिलं तर कळून येते की ते पुटपुटणाऱ्या आत्म्यांबद्दल सांगत असायचे. सहजयोगातही तो सर्वांसाठी खुला असल्यामुळे, अनेक प्रकारचे लोक आले आहेत. सहजयोगांतही काही उथळ वृत्तीचे लोक आले आहेत आणि ते सहजयोगाबद्दल बाष्कळ बडबड करून किंवा सहजयोगच्या कार्याबद्दल नसती बडबड करून या उथळपणाचे प्रदर्शन करत असतात.त्याला इलाज नव्हता पण ख्रिस्त म्हणाले होते की या पुटपुटणाऱ्या आत्म्यांबद्दल तुम्ही जागरुक राहिले पाहिजे.याच गोष्टीची आपण फार काळजी घेतली पाहिजे. तुम्ही सहजयोगात नवीन असता तेव्हा तुम्ही अशा लोकांच्या ताब्यात जाण्याची शक्यता असते. कारण ते एक प्रकारे असं म्हणू या, विरोधी शक्तीचे संदेशवाहक असतात. अशा लोकांना तुम्ही शोधून काढायचा प्रयत्न केला पाहिजे ते नेहमी कुरकुर करत असतात, उथळपणाच्या गप्पा मारत असतात आणि तुमच्या जेव्हा असले प्रकार नजरेस पडतात तेव्हा तुम्ही त्यांच्यापासून दूर राहिलेलच बरं. कारण नुसतं तुमचं पुनरुत्थान झाल्याने तुम्ही काही मिळवत नाही. पुनरुत्थान झाल्यावर, म्हणजे साक्षात्कार मिळाल्यावर तुम्हाला गहनतेत उतरुन प्रगल्भ व्हायचं आहे आणि ही गहनता मिळवण्यासाठी आपल्यावर अशा लोकांचा कसा प्रभाव पडतो, ज्यांना मला वाटतं कुचकामी म्हणावे, इकडे आपण फार लक्ष ठेवले पाहिजे. याच्यापासून पार पडून जे पुढे येतात ते जणू सुंदर देवदूत बनतात. याबद्दल कहीच शंका नाही, पण लक्षात ठेवायची मुख्य गोष्ट म्हणजे तुम्हाला मिळालेल्या आत्मसाक्षात्काराचा तुम्ही आदर राखला पाहिजे.दुसरे लोक काय बोलतात काय म्हणतात कशाबद्दल टीका करतात वगैरेची काळजी न करता तुम्ही स्वत:कडेच पहायची सवय करा आणि या

गहनतेमधून स्वतःची वाटचाल करत रहा.

तुमचे पुनरुत्थान होण्याची फार महान संधी या जन्मात तुम्हाला मिळाली आहे आणि तुम्हाला माहीत आहे की हाच उत्क्रांतीचा शेवटचा टप्पा आहे. आता तुम्ही मन बाजूला ठेवा कारण तुम्ही मनाच्या व्यापारातच रहाल तर तुम्ही मनाच्या पलीकडे जाऊ शकणार नाही.सहजयोगाची प्रगती ही विचार थांबल्यावरच होणार आहे. मगच तुम्ही स्वतःला ओळखू शकाल कारण तुम्हाला आत्म्याचे ज्ञान झालेले असते. तुमची चक्रे तुम्ही जाणू शकता. दुसऱ्याची चक्रे पण जाणू शकता.हे सर्व ज्ञान तुमच्याजवळ उपलब्ध आहे. पण तुम्ही सतत सूक्ष्म सुक्ष्मत्तर व्हायला पाहिजे. जड मानव नव्हे . अशी सूक्ष्मता जशी अंगी बाणेल तसतशी तुमची अंगशक्ती वृध्दिंगत होईल आणि तिचा तऱ्हेतऱ्हेचा आविष्कार पाहिल्यावर तुम्ही थक्क व्हाल.

सहजयोगात काही लोक महत्त्वाकांक्षी असल्याचे मी पाहिले आहे. ते म्हणू लागतात की श्रीमाताजी आम्हाला परमेश्वराचा साक्षात्कार हवा आहे. मला हे करायचे आहे. ते करायचे आहे. आम्ही त्यांना महायोगी म्हणतो. म्हणून तुम्ही आता लक्षात ठेवायचे की आता शेवटचा निर्णय होणार आहे आणि फार मोठी गाळणी सुरू झाली आहे.निवड करण्याचे मोठे काम सुरु झाले आहे.जे गहन आणि सूक्ष्म आहेत ते अधिक अधिक गहनतेत उतरणार आहेत आणि जे उथळ, मूर्ख, विचित्र आणि जड आहेत ते बाहेर फेकले जात आहेत. अशी ही गाळण फार भराभर चालली आहे आणि ते चालू असतानाच आपण कुठे आहोत हे आपल्याला समजून घ्यायचे आहे.

आता हे कसे ओळखायचे? प्रथम म्हणजे तुमची करुणा! तुमच्या करुणेमध्ये विवेक असावयास हवा. कधी कधी लोकांना अयोग्य (निगेटीव्ह) लोकांबद्दल चुकीची करुणा येते. सहजयोगात आल्यानंतर तुम्हाला कोणाबद्दल करुणा वाटायला हवी ते समजले पाहिजे. व्हायब्रेशनमधून हे समजणे अगदी सोपे आहे. समोरचा माणूस कसा आहे हे समजून घ्या. त्यासाठी तुम्हाला चैतन्यलहरींची जाणीव हवी अशी जाणीव नसेल तर तुम्हाला खरे काय आणि खोटे काय ते समजणार नाही. म्हणून तुम्ही सर्वांनी नियमितणे ध्यान केले पाहिजे.स्वतःला दोष न देता तुम्ही नियमितपणे ध्यान करू शकता.हे फार महत्त्वाचे आहे. कोण ध्यान करतो आणि कोण करीत नाही ते मला लगेचच समजते.अगदी क्षणभरात! जो नियमित ध्यान करतो तो अगदी देवदूतासारखा असतो; त्या व्यक्ती चे सर्व वागणे, बोलणे ,त्याच्या प्रतिक्रिया त्याचा दृष्टीकोण या सर्वांमधून प्रगल्भ दिव्यत्व प्रत्ययाला येत असते आणि तुम्ही चकित होऊन जाता! ''सहस्रारांतील महामाया'' तुम्ही जाणता. मला ओळखणं फार कठीण आहे. एखाद्या वेळी तुम्ही ''मी कोण आहे हे कदाचित ओळखू शकाल पण क्षणभरातच ते विसराल. ही किमया आहे. कारण तुम्ही जर मला पूर्णपणे ओळखू शकला असता तर तुम्ही इथे बसणारच नाही; माझ्या जवळही यायला तुम्ही धजवणार नाही. म्हणून ही महामाया सदोदित कार्य करत असते, पण त्याच्यामुळेच लोकांच खर स्वरुप कळून येते. शेवटचा निर्णय ही काही सोपी गोष्ट नाही! हजार न्यायाधीश जरी एकत्र आले तरी ते असा निकाल देऊ शकणार नाहीत. काय खरं आहे हे तुम्ही सर्वकाही समजून घ्यायला हवं.काहीही झाले तरी मला सर्व काही कळत असते पण मी मला हे सर्व ठाऊक आहे असे कधीही दर्शवणार नाही. अशा तऱ्हेनी मी सारे काही करत असते आणि एखाद्या माणसाचे काय करायचे ते हळूहळू मला समजते.

तुमच्या या पुनरुत्थानाला ख्रिस्तापेक्षाही फार मोठे आशीर्वाद मिळाले आहेत. ते एकटेच होते आणि लोक त्यांना ओळखू शकले नाहीत. त्यांच्या हातावर आणि पायावर ज्या ज्या ठिकाणी त्यांना खिळे मारले होते त्या खुणा त्यांना दाखवून द्यावयाच्या होत्या.पण आता तशी परिस्थिती नाही.एकच गोष्ट म्हणजे पहिले प्रथम तुम्ही मला ओळखायला हवे. बस मी कोण आहे हे समजण्याची जरुरी नाही. ती फार अवघड गोष्ट आहे. मला समजणे अवघड आहे पण मला ओळखले की सारे मिळाले! आणि हे सर्व तुमच्या संवेदनक्षमतेवर अवलंबून आहे.तुमचे पुनरुत्थान पूर्णपणे व्हायला हवे आणि सहजयोगांत तुम्ही प्रगल्भ व्हायला हवे. अशी प्रगल्भता तुम्ही मिळवली नाही तर मी म्हणेन तुम्ही सहजयोग सोडून द्या.काही काळ बाहेर रहा, मग तुम्हाला हे सर्व काय चाललंआहे ते उमजेल आणि तुम्ही परत याल.

ख्रिस्तांनी आपल्या आयुष्याच समर्पण केलं तसं सहजयोग तुम्हाला तुमच्या आयुष्याचा त्याग करायला सांगत नाही. तुमच्या आईला पण तसं काही नको, पण तरीही तुम्हाला काही त्याग करायला हवा.महत्त्वाचा त्याग म्हणजे तुमच्यातील अहंकाराचा, या अहंकाराला सुळावर द्यायचे. या अहंकारामुळेच तुम्हाला नुसत्या कल्पना सुचतात.हा अहंकार जर अर्पण केला तर तुम्हाला खूप मदत होईल.पण नुसता त्याला अर्पण करण्याबद्दल विचार करत बसलात तर तुमची मनशक्तीच फक्त खर्च होत राहील. अशा तऱ्हेच्या सर्व गोष्टी तुमच्या मनाचेच खेळ असतात आणि त्यातूनच तुमच्यातील अहंकाराचा वापर होत रहातो. म्हणून सर्वात उत्तम उपाय म्हणजे ध्यान करणे, निर्विचारतेच्या जाणीवेमध्ये उत्तम उपाय म्हणजे ध्यान

करणे, निर्विचारतेच्या जाणीवेमध्ये जाणे; त्यापासून आपोआप तुम्ही समर्पित बनू लागता. आतां मला तुमच्याकडून काय हवे आहे? काहीच नाही.मला कशाचीही जरुरी नाही, मला स्वत:करता नाहीच नकोय, तुम्हीच मला हे देता, ते देता. मला त्या सर्व गोष्टीपासून दूर जावेसे वाटते. फक्त तुमच्या समाधानाकरता मी ते मान्य करते. मला स्वत:साठी सहजयोग करण्याची जरुरी नाही पण हे सर्व तुमच्या आईचे प्रेम आहे, तिला या पृथ्वीवरील जास्तीत जास्त माणसांना तारायचे आहे; त्यांचे पुनरुत्थान करावयाचे आहे. हा एक विशेष समय आहे आणि तुमच्याद्वारेच मला हे कार्य करायचं आहे. तुम्ही सगळीकडे जाऊन सहजयोगाचा प्रचार व प्रसार करायला लागा आणि त्या कामासाठी इतरांना पण तयार व्हायला मदत करा.

आजचा दिवस प्रतिज्ञा करण्याचा आहे, प्रतिज्ञा स्वत:लाच वचन देऊन करायची की आम्ही सहजयोगात उत्तरोत्तर वृध्दिंगत होऊ, जेणेकरुन सहजयोगाबद्दलच्या आमच्या भावना, ज्ञान आणि संवेदनशीलता गहन होतील; त्या समतेसाठी मी रोज ध्यान करेन ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.दुसरी गोष्ट म्हणजे लोक म्हणतात की इथले लोक फार कंजूष आहेत. ते हे करायला तयार नाहीत, ह्याला पैसे द्यायला, ते विकत घ्यायला तयार नसतात. मला वाटते की तुमचे प्रेम तुमच्या औदार्यामधून व्यक्त होत असते. तुम्ही मला काही तरी घ्याल , ते ठीक आहे, मला काही जरुर नाही, माझ्यासाठी मी स्वत:चे पैसे खर्च करते. पण उदारपणाची वृत्ती सगळ्यात चांगली आणि ह्या औदार्याला सहजयोगात फार फार महत्व आहे.

कधी कधी लोक फार चिकित्सक व हिशोबी वृत्तीचे असलेले मला दिसते. ते मला त्यांच्यासाठी साड्या आणायला सांगतात. ह्या घ्या साड्या, चांगली कल्पना आहे, ठीक आहे. वर म्हणतील आम्हाला आवडल्या नाहीत, आम्ही विकत घेणार नाही. मी काय धंदा करत नाहीये, पण तुम्हाला पाहिजे होत्या म्हनून मी निवडून आणल्या. मग नको म्हणायला इथे काही धंदा चालला नाही किंवा बाजार मांडला नाही! असा प्रश्न आला की ते सहजयोगी आहेत कां हे मला समजत नाही? त्यांना समजत का नाही की श्रीमाताजींनी स्वत:चे पैसे खर्च केले आहेत? उलट असं असायला हवं की त्यांनी आपणहून म्हणावे, सहजयोगासाठी थोडे जास्त घ्या.

ख्रिस्तांना तीस रुपयाला विकले गेले; कल्पना करा,फक्त तीस रुपये याचाच अर्थ हा की तुम्ही कार्यकर्त्यांचे आर्थिक प्रश्न समजून घेत नाही, त्यांना मदत करत नाही. तुमच्यामधील ख्रिस्ताला तुम्ही विकायला निघाला आहात. तुम्ही ख्रिस्तांना विकू शकत नाही, सहजयोग विकू शकत नाही. पण त्याचा अर्थ असा नाही की तुम्ही फायद्यासाठी वापर कराल .म्हणून मला सांगायचे आहे की औदार्य असण्यात तुमचाच फायदा आहे की त्यातूनच तुमच लक्ष्मीतत्त्व जागृत होणार आहे. हा मुद्दा मला सांगावा लागत आहे कारण माझ्याकडे बऱ्याच तक्रारी आल्या आहेतकी लोक पैसे द्यायला काचकुच करतात. काही लोक आपणहून पुढे येतात ही गोष्ट कौतुकास्पद आहे पण प्रत्येकाने आर्थिक भार वाटून घ्यायला हवा. हे फार महत्वाचे आहे . कारण परमेश्वरी कार्य करत आहो.त्याचाच आनंद घ्या! सहजयोग्यांनी फलक लावलेले पाहून मला फार समाधान झालं, ह्या सर्व परिसरांत चैतन्य भरुन राहिल्याच तुम्हालाच जाणवेल. हे कस कार्यान्वित झाले आहे हे तुम्हाला समजेल. म्हणून प्रत्येकाने अगदी शर्थीने जे काही शक्य असेल ते करायला हवं. दुसऱ्या कशाची जरुर नाही, फक्त तुमचे हृदय पूर्णपणे सहजयोगाला वाहून घ्यायला हवं.मग तुमची वाढ कशी व किती होत आहे हे तुम्हाला दिसेल. तुमच्या भविष्यासाठी जरुर असलेली सर्व शक्ती तुम्हाला तुमच्याच हृदयातून मिळेल. म्हणून हिशोब करत बसू नकां, तुमच हृदय उघडू दे.

ह्या दिवशी ख्रिस्त मृत्यूलोकातून परत आले आणि त्यांचे पुनरुत्थान झाले. तुम्ही तुमच्या देहातूनच त्यांच्यासारखे पुनरुत्थान मिळविले पाहिजे. मृत्यूनंतर नव्हे तर आत्ताच जिवंतपणीच. जिवंत असतांनाच तुमच पुनरुत्थान होते पण या उत्क्रान्तीची विशेषता तुम्ही समजून घेतली पाहिजे. पुनरुत्थानानंतर तुम्ही जास्त सूक्ष्म व्हायला हवं. सहजयोगामध्ये तुम्ही फक्त तुमच्या आध्यात्मिक उन्नतीचाच विचार करायचा असतो. दुसरे कसलेही विचार तुमच्या मनात यायला नकोत.

आता प्रत्येकजण माताजींना विचारतो आहे की बंगालमध्ये अजून लक्ष्मीतत्त्व का नाही जागृत झाले?याला कारण तिथे जादूटोणा करणारे खूप लोक आहेत. जिथे जिथे ही तंत्रिक मंडळी जातात तिथून लक्ष्मी दूर निघून जाते. तीच गोष्ट दारुबद्दल. काही काळ ठीक आहे पण नंतर दारुपासून लक्ष्मी दूर जाते. बंगालमध्ये तांत्रिक खूप आहेत याचे कारण मला अस दिसते की बंगालमधले लोक साधेभोळे व भावनाप्रधान आहेत व कुणीही येऊन सांगायला लागले की ते परमेश्वराचे दूत आहेत की त्यांचा लगेच विश्वास बसतो. काही विचार वगैरे न करताच हरे-राम म्हणणाऱ्या लोकांनी बंगालमधूनच प्रचाराला सुरुवात केली. वेड लागल्यासारखे रस्त्या-रस्त्यातून त्यांच्याबरोबर यायला लागले, हरे राम हरे राम सुरु. काय फायदा मिळाला? गरिबी आणखीनच वाढली. बंगालमध्ये नवीन काही म्हणायला कुणीही

सुरवात केली की लोक लागले त्याच्यामागे. त्यांच्याकडे तऱ्हेतऱ्हेची कर्मकांडे व व्रते असतात आणि अशा कर्मकांडामध्ये आपण हरवून जातो. पूर्णपणे स्वत:ला विसरतो. खरंतर या कर्मकांडामागचे रहस्य. अर्थ आपण शोधून काढला पाहिजे. सहजयोगामध्ये कसलेही कर्मकांड नाही, कशावरही टीका नाही, कुठल्या धर्मावरही टीका नाही आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विश्वबुधुत्वाची भावना प्रस्थापित होते आणि ती हृदयापासून सरू होते. ज्या दिवशी विश्वबंधुत्वाची भावना प्रस्थापित होते आणि ती हृदयापासून सुरु होते. ज्या दिवशी विश्वह्वबंधुत्वाच्या भावनेची जाणीव होईल त्यावेळेस आपण तांत्रिक लोकांच्या जाळ्यातून मुक्त होऊ एक सहजयोगी तांत्रिक लोकांना घालवून द्यायला पुरेसा असतो. एवढी त्याची शक्ती असते. तुमचे आता पुनरुत्थान झाल आहे व तुम्ही स्वच्छ, सुंदर झाला आहांत आणि तुमच्यामधील शक्तीचा आता आविष्कार होत आहे.

सहजयोग्यांनी स्वत:ची स्वच्छता करू न शुद्ध झाले पाहिजे. त्याऐवजी ते भक्तीमध्ये आणि भावनोत्कटतेमध्ये दंग होतात हे चांगले असले तरी स्व मध्ये रममाण होणे फार चांगले. तुमच्या शक्ती वृध्दीगत करा. ज्या दिवशी तुमच्यातील शक्ती प्रभावशाली होतील त्यावेळेस हे तांत्रिक लोक बाडबिस्तरा घेऊन पसार होतील. म्हणून आजच्या या पुनरुत्थानाच्या दिवशी तुम्ही शपथ घ्यायला हवी. तुम्ही स्वत:च परिवर्तन घडवून उच्च स्तरावर येण्याचा आणि एक प्रगल्भ सहजयोगी बनायचा प्रयत्न कराल आणि त्यासाठी आपण ध्यान करण जरुरीचे आहे. तीन तीन तास ध्यान करत बसायचे. अस नव्हे तर दहा मिनिटे बसा पण हृदयापासून ध्यान करा. ध्यानामध्ये हृदय पूर्णपणे ओतणे फार आवश्यक आहे.

बंगालमधले लोक मोठ्या अंत:करणाचे आहेत व प्रेमळ आहेत पण तुम्ही -पात्र -आहात का? तुम्ही सहजयोगी असाल तर प्रथम स्वत:वर प्रेम करायला शिका मग तुम्हालाच समजेल की हेच दुसऱ्या लोकांकडे ही पसरत आहे. तुम्हाला राग येईल, तुम्हाला इच्छा, वासना वाढतील, तुमच्या सवयी असतील, तरीही तुम्ही या सर्वापासून जेव्हा स्वत:ला स्वच्छ कराल तरच तुमच पुनरुत्थान झाले अस म्हणता येईल आणि तुमच्या व्यक्तिमत्त्वातले हे सारे दोष जाऊन तुम्ही स्वच्छ व्हाल तेव्हा इथे कोणताही तांत्रिक शिल्लक राहणार नाही. कुणीही तांत्रिक इथे राहू शकणार नाही!

दुसरे म्हणजे तुमच्यात संगीताचे चांगले कलाकार आहेत, तेव्हा अशा पुरुष व महिला कलाकारांनी एकत्रितपणे बस किंवा ट्रक भाड्याने घेऊन खेडेगावात जावे आणि तिथे माताजींच्या भजनांचा कार्यक्रम होणार आहे असे जाहीर करावे. अशा तऱ्हेने तुम्ही तिथे एकत्र जाऊन गाणी-भजने म्हणा, थोड-फार बोला आणि माझ्या कॅसेटस लावा. उत्तर प्रदेश, बिहार ,हरियाणा इ. उत्तर भागात पुष्कळ जण उन्नत झाले आहेत आणि त्यामुळे बऱ्याच ठिकाणी सहजयोग पसरला आहे. तुमच्याजवळ संगीताची चांगली कला आहे तर तुम्ही खेड्यापाड्यात जाऊन तिथल्या लोकांना तुमच्या कलेद्वारे आकर्षित करा आणि त्यांच्या उद्धाराकरता त्यांना मदत करा. असे केल्याने सगळीकडचे तांत्रिक पळून जातील . माझ नुसते नाव ऐकले तरी ते थर थर कापतील . तेव्हा तुम्ही जेव्हा माझी भजने म्हणाल तेव्हा तुम्ही काय मिळवू शकणार नाही? तुम्हाला तुमच्या आईकडून जे प्रेम मिळाल आहे ते वाटून घ्या. या प्रदेशात लोकांन प्रेमाचे किती आकर्षण आहे ते तुम्ही जाऊन पाहण्यासारख आहे आणि तुम्ही तिथे गेलात की लक्ष्मी पण तिकडे येईल. तुमच्या जाण्याने लोकांचे शारीरिक त्रास कमी होतील, त्यांची मानसिक स्थिती सुधारेल आणि सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे त्यांची आध्यात्मिक वाढ पण होईल. अशा तऱ्हेने आपल्याला आपल्या देशांतील लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणायचं आहे आणि यासाठी तुम्ही सगळीकडे जाऊन कार्य करायला हवं.

आजचा दिवस फार महत्त्वाचा आहे आणि तो असा की ख्रिस्तांनी या दिवशी दाखवून दिले की मानवप्राणी स्वत:च उन्नत होऊ शकतो. पण त्यांनी ज्या अटी घातल्या होत्या त्या पाळणे आपल्याला शक्य नाही. त्यांनी सांगितले की तुमच्या एका डोळ्याने पाप केल तर तुम्हीच तो डोळा काढून टाका, हाताने जर गैर काम केला तर तो हात कापून टाका. मी ख्रिश्चन लोकांबरोबर खूप वावरले आहे पण ज्याने एक डोळा काढून टाकला आहे किंवा एक हात कापून टाकला आहे असा एकही माणूस ख्रिश्चन समाजात मला दिसला नाही. म्हणजे त्यावेळेस त्यांनी ही अट गुंडाळून ठेवली. आता सहजयोगांत आल्यावर तुम्ही स्वत:बद्दलच शत्रुत्व करु नका. तुम्ही आत्मपरिक्षण केल पाहिजे आणि स्वत:चे दोष शोधून काढले पाहिजेत. तुम्हाला स्वत:बद्दल खर प्रेम असेल तर ते दोष काढून टाका. अस केल्याने तुम्ही पूर्णपणे उन्नत होऊ शकाल.

एकदा हे दोष काढून टाकले की तुम्हीच स्वत:ला आनंदी, शांत व शक्तिशाली झाल्याचे पाहून चकित व्हाल. तुमच्या शक्तीच्या प्रभावाच्या आड येणाऱ्या साऱ्या आडथळ्यांना काहीही किंमत मोजून दुर करण फार जरुरीच आहे. आपण आपल्या उध्दाराकडे लक्ष देत नाही म्हणून या गोष्टी आपल्या उन्नतीच्या आड येतात; आता

पुनरुत्थान झाल्यामुळे आपण परमेश्वराच्या साम्राज्यात आलो आहोत, पण तिथे बसण्याआधी आपण स्वच्छ झाले पाहिजे.

प्रथम तुम्ही स्वत:ला कमी लेखणं बंद करा आणि चुकीच्या मार्गाने न जाण्याविषयी स्वत:ला बजवा; नाही तर तुम्हाला शांतता कशी मिळणार? हे फार अवघड आहे.शांती मिळवणं मुळीच अवघड नाही पण त्यासाठी ध्यान करण आवश्यक आहे आणि सगळ काम हृदयापासून करा, मग काही आवघड नाही. सहजयोगामध्ये पुष्कळ लोक अशा स्तरावर आलेले मला दिसतात व त्यांचे प्रेम शक्तिशाली झाल्याच दिसते.

आज मी अशाच एका माणसाचा उल्लेख करणार आहे. हा माणूस -आई-बद्दल अगदी एकनिष्ठ आहे. आम्ही स्टेशनपासून विमानतळाकडे जात होतो. आम्ही हॉलंडला जाणार होतो आणि एका सहजयोग्याने आम्हाला सांगितले की विमान ११ वाजता निघणार आहे. त्याप्रमाणे आम्ही तयार होतो. पण नंतर तो म्हणाला की विमान लवकर निघणर आहे आणि आम्हाला शक्यतो लवकर तिथे पोचले पाहिजे. हे कसे जमणार? आम्हाला पोचायला १५ मि. उशीर झाला. म्हणून तेथील ऑस्ट्रियन एअर होस्टेसला खूप राग आला कारण ते विमान प्रथम ऑस्ट्रियाला जाणार होते. ती आमच्यावर ओरडायला लागली आणि म्हणाली- तुम्ही असेच आहात, तुम्हाला वेळेची किंमत नाही. हे सारे. ऐकून तो माणूस फार शरमिंदा झाला कारण त्यानेच आम्हाला विमानाची वेळ सांगितली होती. आम्ही सर्व जण विमानात जाऊन बसलो. हा माणूस फारच भावनाप्रधान झाला आणि त्याच्या डोळ्यातून अश्रू यायला लागले. तो जर्मन होता आणि मागच्या सीटवर बसला होता. इतर सहजयोग्यांने त्याला रडणे थांबवण्यास सांगितले. मी फक्त त्याच्याकडे पाहिले आणि काही हरकत नाही, काळजी करु नकोस अस त्याला सांगितल. त्याचवेळी आम्हाला सांगण्यात आल की काही बिघाड झाल्यामुळे विमान निघणार नाही पण मी त्याच्या डोळ्यातले अश्रू पाहिले आणि क्षणभरात आकाशात सगळीकडे काळेकुट्ट ढग जमा झाले, साऱ्या सहजयोग्यांना आश्चर्य वाटल की एकाएकी हे ढग कुठून आले त्याच्या प्रेमाची शक्ती पहा. आम्हाला उतरुन पुन्हा विनामतळावर जायला सांगण्यात आले, कारण विमान निघणार नव्हते आम्ही विमानतळावर पोचताच जोराचा पाऊस पडायला लागला. दुसरव्कुठलही विमान निघणार नव्हते पण आमचं विमान पाच वाजता निघेल अस आम्हाला सांगण्यात आले. मग तो माणूस त्या एअर होस्टेसकडे गेला आणि म्हणाला आता तुमच्यामुळे आम्हाला उशीर होत आहे. तरी आम्ही पण तुमच्यासारखे तुमच्यावर ओरडायचे का? ती मॅनेजरकडे गेली आणी घडलेला सर्व प्रकार त्याला सागितला. आता त्या लोकांना वाटल की आम्ही कोणी विशेष शक्तिशाली लोक आहोत. नंतर आकाशांत एकही ढग शिल्लक नव्हता.मग त्यांनी आम्हाला बाहेर जायला आणि परत आमच्या सोयीने आत यायला परवानगी दिली. आमची सर्व काही व्यवस्था केली.

आम्ही जेव्हा दुसऱ्या विमानकडे जायला निघालो तेव्हा एक महिला, जी आधीपासूनच हे सारे पहात होती, माझ्याजवळ आली आणि तिच्या हाताच दुखण बरे करायला विनंती करू लागली.मी तिला हाताने फक्त स्पर्श केला आणि तिने हात वर उचलून तो दुखायचा बंद झाला अस सांगितले. विमानतळावरचा मुख्य अधिकारी आमच्याकडे आला आणि आपल्या पाठीच्या दुखण्याबद्दल सांगू लागला आणि ते दुखणं बरे करण्याची त्याने विनंती केली. मी त्याला उशीर होत असल्याबद्दल सांगितले तरी तो म्हणाला की मी तुमच्यापुढे चालतो, तुम्ही पाठीमागून माझ्या पाठीवर तुमचा हात ठेवा. अशा तऱ्हेने आम्ही विमानापर्यंत चालत गेलो. मग त्याने मागे वळून त्याच दुखण बर झाल्याचे सांगितले.आमच्या जवळ ही शक्ती आहे हे या लोकांना कसे समजले बघा. या माणसाचे प्रेम कस आहे ते बघा आणि त्या प्रेमामध्ये किती शक्ती आहे हे पहा!

तुमच तुमच्यावर प्रेम असेल तर तुम्ही स्व:तला सुधारल पाहिजे. तुम्ही स्वत:साठीही थोडा वेळ काढा.बंगालमध्ये सहजयोगी लोक कार्य करत आहेत. पण बंगालमधील परिस्थिती तेव्हाच सुधारेल जेव्हा सहजयोगी लोक खेड्यापाड्यात जाऊन कार्य करतील. तुम्हा सर्वाच पुनरुत्थान झाल आहे, म्हणून आज तुम्हाला माझ सांगण आहे की कलकत्यात बसून राहू नका तर खेड्यात जा आणि काम करा. ही जी अनमोल देणगी तुम्हाला मिळाली आहे तिची वाढ इतरांना वाटल्यावरच पसरणार आहे आणि त्याचा साऱ्या बंगालला फायदा होणार आहे.

आज पूजेला इतके सारे लोक आल्याचे पाहून फार आनंद झाला. पण मी आशा करते की मी पुढच्या वेळेस येईन तेव्हा खेड्यातील जनता पण इथे आलेली असेल. तुमची उच्च संस्कृती आणि संगीत कला याचा उपयोग करा आणि साऱ्या बंगालमध्ये सहजयोगाचा प्रसार करा.परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

● ● ●

तरी न्यून तं पुरितं । अधिक तं सरतं ।। करूनी घयावं हिं तुमतं । विनवत असं ।।

# श्रीमाताजी व श्रीपापाजी लग्नाचा ६०वा वाढदिवस समारंभ, ७ एप्रिल २००७











# सहज संग्रहालय उदघाटन सोहळा, २० मार्च २००७





